# आपलं सांज सह्याद्री टाइम्स

दैनिक ■ मुंबई ■ वर्ष २० ■ अंक २३३ ■ बुधवार, दि.७ ऑक्टोबर २०२६ ■ पाने ४ ■ किंमत १ रू. RNI No.MAHMAR /2007/20939 Website: https://aaplasanjsahyadritimes.com संस्थापक संपादकःस्व.संदीप काळे

Daily ■ Aapla Sanj Sahyadri Times ■ Mumbai ■ Vol.20 ■ Issue 233 ■ WEDNESDAY, 07 OCTOBER 2026 ■ Page 4 ■ Price Rs.1


## सज्ञान मुलीला पालकांसोबत राहण्याची सक्ती करता येणार नाही:आईची याचिका फेटाळत उच्च न्यायालयाचा निर्णय!

**नवी दिल्ली:**एका सज्ञान मुलीला तिची इच्छा नसताना पालकांसोबत राहण्याची सक्ती केली जाऊ शकत नाही, असा निर्णय उच्च न्यायालयाने दिला आहे. स्वतःचे राहण्याचे ठिकाण आणि सोबत कोण असावे हे निवडण्याचा अधिकार प्रत्येक सज्ञान व्यक्तीला आहे; त्यामुळे तिच्या स्वातंत्र्याचा आणि निर्णयाचा सन्मान झालाच पाहिजे, असे स्पष्ट करत न्यायालयाने एका आईची याचिका फेटाळून लावली.एका महिलेने आपल्या २५ वर्षांच्या मुलीला न्यायालयात हजर करण्याचे आदेश द्यावेत, यासाठी हेबियस कॉर्पस' म्हणजेच बंदी प्रत्यक्षीकरण याचिका दाखल केली होती. न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार राज्य प्रशासनाने मुलीला न्यायालयात हजर केले.न्यायाधीशांशी झालेल्या थेट संवादादरम्यान मुलीने स्पष्ट केले की, ती दिल्लीत स्वेच्छेने आणि स्वतंत्रपणे राहत आहे. तिने कोणाच्याही बेकायदेशीर ताब्यात असल्याचा आरोप फेटाळून लावला. आईची माझ्यासोबतची वागणूक अत्यंत वाईट होती. मला घरात सातत्याने मारहाण आणि शिवीगाळ सहन करावी लागत होती.

# दिल्ली दणाणली!

## बॅरिकेड्सवर चढत तिरंगा फडकावला, ज्ञानेश कुमारांच्या विरोधात राहुल गांधी आक्रमक





**नवी दिल्ली :** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी लोकशाहीविरोधात गद्दारी केली आहे, त्यामुळे त्यांनी तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी आक्रमक मागणी करत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी दिल्लीत थेट रस्त्यावर उतरून आंदोलन केले. दिल्लीमध्ये इंडिया आघाडीच्या 'सेव्ह डेमॉक्रसी मार्च' दरम्यान राहुल गांधी यांचा आक्रमक अवतार पाहायला मिळाला. आंदोलनाला रोखण्यासाठी दिल्ली पोलिसांनी लावलेल्या बॅरिकेड्सवर स्वतः चढत राहुल गांधी यांनी हातात तिरंगा फडकावला. या आंदोलनामुळे दिल्लीतील राजकीय वातावरण प्रचंड तापले असून संपूर्ण देश ढवळून निघाला आहे.आंदोलनादरम्यान माध्यमांशी बोलताना राहुल गांधी यांनी केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगावर जोरदार निशाणा साधला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, सरसंघचालक मोहन भागवत आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी मिळून देशातील लोकशाही संपवली आहे. देशाच्या निवडणुका मोदी आणि शाह यांनी हायजॅक केल्या असून ज्ञानेश कुमार यांनी त्यांना थेट मदत केली आहे, असा आरोप राहुल गांधींनी केला.ज्ञानेश कुमार घाबरले आहेत. जर लोकप्रतिनिधींना निवडणूक आयुक्त भेटणार नसतील तर देशात लोकशाही उरली कुठे? या सर्व प्रकारात सहभागी असलेल्या एकाही व्यक्तीला सोडले जाणार नाही, सर्वांवर देशद्रोहाची कारवाई होईल, असा थेट इशाराच राहुल गांधींनी दिला.संसद भवनापासून निघणारा हा मोर्चा निवडणूक आयोगाच्या कार्यालयाकडे जात असताना पोलिसांनी बॅरिकेडिंग करून इंडिया आघाडीच्या ३०० हून अधिक खासदारांना रोखले. पोलिसांनी राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांना ताब्यात घेऊन बसमध्ये बसवले. मात्र, बसमधून उतरून दोन्ही भावा-बहिणीने गनिमी काव्याने थेट जवळच असलेल्या आकाशवाणी भवनाच्या परिसरात प्रवेश केला.आकाशवाणी भवनातील एका झाडाखाली प्रियंका गांधी यांच्यासोबत बसून राहुल गांधींनी दोन तासांपेक्षा जास्त वेळ ठिय्या आंदोलन केले. निवडणूक आयोगाचे कार्यालय अवघ्या २७० मीटर अंतरावर असताना प्रतिनिधींना भेटू न देणे हा लोकशाहीचा अपमान असल्याची टीका त्यांनी केली.एसआयआर आणि निवडणूक आयोगाच्या भूमिकेविरोधात ३० सप्टेंबरच्या बैठकीत इंडिया आघाडीने ६ ऑक्टोबर रोजी हा भव्य मोर्चा काढण्याची घोषणा केली होती. त्यानुसार ३०० खासदार निवडणूक आयोगाकडे निघाले होते.गेल्या पाच दिवसांत दिल्ली आणि मुंबईत निवडणूक आयोगाच्या कारभाराविरोधात झालेले हे तब्बल सातवे मोठे आंदोलन आहे. राहुल गांधी यांच्या या आक्रमक पवित्र्यामुळे आगामी काळात राजकीय संघर्ष अधिक तीव्र होण्याची स्पष्ट चिन्हे दिसत आहेत.

## निवडणूक आयुक्तांच्या विशेषाधिकारांवर सर्वोच्च न्यायालयाची अत्यंत गंभीर टिप्पणी

**नवी दिल्ली,प्रतिनिधी:**केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त आणि दोन्ही निवडणूक आयुक्तांना त्यांच्या कार्यकाळातील निर्णयांवरून मिळणाऱ्या कायदेशीर संरक्षणाबाबत सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत महत्त्वपूर्ण आणि गंभीर टिप्पणी केली आहे. २०२३ च्या नव्या कायद्यानुसार निवडणूक आयुक्तांना दिलेले दिवाणी आणि फौजदारी संरक्षण हे देशातील घटनात्मक न्यायालयांच्या न्यायाधीशांनाही मिळालेले नाही, असे खडे बोल सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने सुनावणीदरम्यान सुनावले.सोमवारी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात आणि मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण' प्रक्रियेतील कथित मनमानी कारभाराविरोधात दाखल याचिकांवर सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी पार पडली.

याचिकाकर्त्यांची बाजू मांडताना ज्येष्ठ विधिज्ञ विकास सिंह यांनी २०२३ च्या मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्त (नियुक्ती, सेवाशर्ती आणि कार्यकाळ) कायदा' यातील तरतुदींवर जोरदार आक्षेप घेतला. २०२३ च्या कायद्यातील कलम १६ नुसार, मुख्य निवडणूक आयुक्त आणि दोन्ही आयुक्तांना त्यांच्या कार्यकाळात अधिकृत कर्तव्ये पार पाडताना घेतलेल्या निर्णयांवर कोणतीही दिवाणी किंवा फौजदारी कारवाई करता येत नाही. धक्कादायक म्हणजे हे संरक्षण त्यांचे पद सुटल्यानंतरही कायम राहते.या तरतुदीवर गंभीर ताशेरे ओढताना न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची म्हणाले, हे अशा प्रकारचे संरक्षण केवळ देशाच्या राष्ट्रपतींनाच उपलब्ध आहे. अगदी घटनात्मक न्यायालयांच्या न्यायाधीशांनाही अशा प्रकारचे कायदेशीर संरक्षण लागू नाही.न्यायमूर्ती बागची यांच्या टिप्पणीला दुजोरा देत ड. विकास सिंह यांनी युक्तिवाद केला. हे संरक्षण इतके असाधारण आहे की प्रत्यक्ष देशाच्या पंतप्रधानांकडेही अशा प्रकारची कायदेशीर ढाल उपलब्ध नाही. या व्यवस्थेमुळे निवडणूक आयुक्तांचे स्थान सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांपेक्षाही वर नेऊन ठेवण्यात आले आहेएसआयआर प्रक्रियेवरून देशभरात सुरू असलेला गदारोळ आणि निवडणूक आयुक्तांना मिळालेल्या या अमर्याद संरक्षणाचा मुद्दा लक्षात घेत, सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार, केंद्रीय निवडणूक आयोग, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि दोन्ही निवडणूक आयुक्तांना अधिकृत नोटीस बजावली आहे. या प्रकरणाच्या पुढील सुनावणीत निवडणूक आयोगाच्या अधिकारांवर आणि कायदेशीर संरक्षणावर न्यायालय काय निकाल देते, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

## दुष्काळाच्या यादीत आणखी १९ तालुके; फेरविचाराचे आदेश

**मुंबई,प्रतिनिधी:**राज्यातील दुष्काळाची परिस्थिती गंभीर होत असताना, आधी दुष्काळ जाहीर केलेल्या २६५ तालुक्यांव्यतिरिक्त आणखी १९ तालुक्यांचा दुष्काळाच्या यादीत समावेश करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. २५ सप्टेंबरच्या शासन निर्णयात ७५ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान नोंदले गेले असले, तरी दुष्काळाच्या निकषात न बसलेल्या या १९ तालुक्यांचा फेरविचार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. संबंधित तालुक्यांचा दुष्काळ जाहीर करण्याचा प्रस्ताव तातडीने पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी मंगळवारी दिली.

या १९ तालुक्यांमध्ये छत्रपती संभाजीनगर विभागातील नांदेड जिल्ह्यातील सुरतखेडा, मुखेड आणि अर्धापूर या तीन तालुक्यांचा समावेश आहे. नागपूर विभागातील चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर, ब्रह्मपुरी आणि बल्लारपूर, गोंदिया जिल्ह्यातील आमगाव, देवरी, सालेकसा आणि गोंदिया, वर्धा जिल्ह्यातील कारंजा, तसेच भंडारा जिल्ह्यातील मोहाडी आणि तुमसर या तालुक्यांचा फ रविचार करण्यात येणार आहे.नाशिक विभागातील नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर, चांदवड आणि निफाड या तीन तालुक्यांचाही यामध्ये समावेश आहे. पुणे विभागातील सातारा जिल्ह्यातील पाटण, तर सांगली जिल्ह्यातील शिराळा आणि कडेगाव या दोन तालुक्यांचा दुष्काळाच्या यादीत समावेश करण्यासाठी प्रस्ताव पाठविला जाणार आहे.दरम्यान, राज्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये नुकसानीचे पंचनामे सुरू असून, १० ऑक्टोबरपर्यंत सर्व पंचनामे पूर्ण करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. महसूल आणि कृषी विभागाचे अधिकारी प्रत्यक्ष बांधावर जाऊन पंचनामे करीत आहेत. छत्रपती संभाजीनगर विभागात ६८ टक्के, पुणे विभागात ३० टक्के आणि नाशिक विभागात २२ टक्के पंचनामे पूर्ण झाले आहेत. कोकण विभागात पंचनाम्यांचे प्रमाण सर्वांत कमी असल्याचे भरणे यांनी सांगितले.केंद्र सरकारने दुष्काळ पाहणीसाठी पथक स्थापन केले असून मुक्तानंद अगरवाल यांच्या नेतृत्वाखालील हे पथक पुढील चार ते पाच दिवसांत महाराष्ट्रात येणार आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदतीसाठी राज्य सरकारने केंद्राकडे १७ हजार कोटी रुपयांची मागणी केली आहे. राज्यात पीक परिस्थिती गंभीर असल्याने मदत मिळणे आवश्यक असल्याचेही भरणे यांनी स्पष्ट केले.

## हरमनप्रीत कौरचा मोठा निर्णय; टीम इंडियाच्या कर्णधारपदाचा घेतला निरोप

**मुंबई,प्रतिनिधी:**भारतीय महिला क्रिकेट संघाची स्टार खेळाडू आणि माजी विश्वचषक विजेती कर्णधार हरमनप्रीत कौरने कर्णधारपदाबाबत मोठा निर्णय घेतला आहे. हरमनप्रीतने भारतीय महिला संघाच्या सर्व फॉरमॅटमधील कर्णधारपदाची जबाबदारी सोडण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, ती यापुढेही खेळाडू म्हणून भारतीय संघाचा भाग राहणार आहे.कर्णधारपद सोडताना हरमनप्रीतने भावनिक प्रतिक्रिया दिली. अनेक वर्षे भारतीय संघाचे नेतृत्व करताना आलेले अनुभव, कठीण प्रसंग, टीका आणि मिळालेले यश यांचा तिने आपल्या संदेशात उल्लेख केला. संघाच्या हिताला नेहमीच प्राधान्य दिल्याचेही तिने सांगितले. हरमनप्रीतने म्हटले की, कर्णधार म्हणून अनेक कठीण निर्णय घ्यावे लागले. काही निर्णय समजून घेतले गेले नाहीत, तर काही निर्णय वैयक्तिक पातळीवरही कठीण ठरले. मात्र, संघाला अधिक सक्षम बनवणे आणि युवा खेळाडूंना स्वत:वर विश्वास ठेवण्याची संधी देणे हा प्रत्येक निर्णयामागचा उद्देश होता.कर्णधारपद सोडताना समाधान वाटत असल्याचेही हरमनप्रीतने सांगितले. भारतीय महिला संघ सध्या चांगल्या स्थितीत असून संघात गुणवत्ता, आत्मविश्वास आणि चांगले भविष्य असल्याचा विश्वास तिने व्यक्त केला. कर्णधारपदाचा अध्याय संपला असला तरी भारतीय क्रिकेटसोबतचा प्रवास सुरूच राहणार असल्याचे तिने स्पष्ट केले.हरमनप्रीत कौरने मार्च २००९ मध्ये पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यातून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले.

## डॉ.मनीषा जेजूरकर मृत्यू प्रकरणात डॉ.स्वाती चव्हाण यांना जामीन

**नासिक,प्रतिनिधी:**नाशिक शहरातील बहुचर्चित डॉ. मनीषा जेजूरकर मृत्यू प्रकरणात महत्त्वाची कायदेशीर घडामोड समोर आली आहे. आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपाखाली अटकेत असलेल्या डॉ. स्वाती चव्हाण यांना नाशिक जिल्हा व सत्र न्यायालयाने नियमित जामीन मंजूर केला आहे. न्यायालयाने ५० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला आहे.गंगापूर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एफआयआरनुसार, मृत डॉ. मनीषा नीलेश जेजूरकर या पेशाने डॉक्टर होत्या. त्यांचे पती डॉ. नीलेश जेजूरकर हे नाशिकच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये मानसोपचार विभागात कार्यरत आहेत. डॉ. नीलेश जेजूरकर यांचे डॉ. स्वाती चव्हाण यांच्याशी जवळचे संबंध असल्याचा आरोप मृत मनीषा यांच्या कुटुंबीयांनी केला होता. या कथित संबंधांमुळे आणि त्रासामुळेच मनीषा यांनी टोकाचे पाऊल उचलल्याची तक्रार पोलिसांत करण्यात आली होती.तपासादरम्यान समोर आलेल्या कागदपत्रांनुसार, जानेवारी २०२६ मध्ये डॉ. स्वाती चव्हाण यांनी मनीषा यांना फोन केला होता. या संभाषणात, ''तुमचे पती तुम्हाला पसंत करत नाहीत'' असे सांगत मनीषा यांचे कमी शिक्षण, बौद्धिक क्षमता आणि सावळा रंग यांसारख्या कारणांवरून हिणवल्याचा आरोप एफआयआरमध्ये करण्यात आला आहे. त्यानंतर ५ मार्च २०२६ रोजी लग्नातील ग्रुप फोटो काढण्यावरून मनीषा आणि त्यांच्या पतीत वाद झाला आणि ७ मार्च २०२६ रोजी डॉ. मनीषा जेजुरकर यांनी टोकाचे पाऊल उचलले.

## मंत्रिमंडळ बैठकीत ७ मोठे निर्णय

**मुंबई,प्रतिनिधी:** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत दुष्काळाच्या परिस्थितीसह विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली. बैठकीत राज्यातील पोलीस, विद्यार्थी, वसतिगृह कर्मचारी, आदिवासी आणि विविध सामाजिक घटकांसाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. एकूण सात निर्णयांना मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.कर्तव्य बजावताना जोखीम पत्करणाऱ्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा आता विशेष सन्मान केला जाणार आहे. अशा कामगिरीसाठी 'मुख्यमंत्री शौर्य पदक' देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.या पुरस्कारासोबत ५० हजार रुपयांचे रोख पारितोषिक, पदक आणि प्रशस्तीपत्र दिले जाणार आहे. पुरस्कारासाठी निवड करण्याकरिता तीन स्तरांवर समित्या स्थापन केल्या जाणार आहेत. वर्षभरातील उल्लेखनीय कामगिरीचा विचार केला जाईल. यावर्षी १ जानेवारी २०२६ पासूनची कामगिरी पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाणार आहे.दरवर्षी १ मे, महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला शौर्य पदकांची घोषणा केली जाईल. त्यानंतर मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पदक प्रदान केले जाणार आहे.पारंपरिक दगडफोडी आणि उत्खननाचे काम करणाऱ्या वडार समाजाला मंत्रिमंडळाच्या निर्णयामुळे दिलासा मिळणार आहे. गौण खनिजांच्या उत्खननासाठी असलेली वार्षिक मर्यादा २०० ब्रासवरून ५०० ब्रास करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल नियम, १९६८ मध्ये आवश्यक सुधारणा केल्या जाणार आहेत. त्यामुळे पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या वडार समाजाला उत्खननाच्या कामात अधिक संधी मिळणार आहेत.

राज्यातील उच्च आणि तंत्रशिक्षण क्षेत्रात संशोधन, नवीन तंत्रज्ञान आणि नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी सीएम सृष्टी' योजना सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.या योजनेअंतर्गत राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय उच्च व तंत्रशिक्षण संस्था, शासकीय तंत्रनिकेतने तसेच काही प्रमुख तंत्रज्ञान संस्थांचा सहभाग असेल. संशोधन आणि नवीन तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी या योजनेचा उपयोग केला जाणार आहे.पोलीस कोठडीत असताना अनैसर्गिक मृत्यू झाल्यास मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसांना आर्थिक मदत मिळावी यासाठी स्वतंत्र धोरणाला मंजुरी देण्यात आली आहे.

## इंडिगो विमान प्रवास महागला, नागपूर मार्गावर भाडेवाढ



**नागपूर,प्रतिनिधी:**विमान इंधनाच्या दरात मोठी वाढ झाल्याने इंडिगोकडून देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय विमान प्रवासासाठी फ्युएल सरचार्ज वाढविण्यात आला आहे. मात्र, यापूर्वी तिकीट बुक केलेल्या प्रवाशांना या वाढीव शुल्काचा फटका बसणार नाही.विमान इंधन अर्थात एटीएफच्या दरात प्रति लिटर तब्बल १६ रुपयांनी वाढ झाल्याने विमान कंपन्यांच्या प्रवास खर्चात वाढ झाली आहे. त्याचा परिणाम म्हणून इंडिगोने ६ ऑक्टोबरपासून करण्यात येणाऱ्या नवीन बुकिंगवर फ्युएल सरचार्ज वाढविला आहे. देशांतर्गत विमान प्रवासासाठी अंतरानुसार ३७५ ते १,३०० रुपयांपर्यंत अतिरिक्त शुल्क आकारले जाणार आहे. गेल्या सहा महिन्यांतील ही तिसरी दरवाढ असल्याने विमान प्रवाशांच्या खर्चात सातत्याने वाढ होत आहे. विशेषत: सणासुदीच्या काळात विमान प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या बजेटवर याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. नागपूरहून दिल्ली, मुंबई, हैदराबाद, बंगळुरू आणि कोलकाता या प्रमुख शहरांकडे जाणाऱ्या प्रवाशांना वाढीव भाड्याचा सामना करावा लागणार आहे. उपलब्ध दरांनुसार नागपूर-हैदराबाद प्रवासाचे भाडे ७,४०१ रुपयांवरून ८,२७० रुपयांपर्यंत पोहोचले आहे. नागपूर-मुंबई मार्गावरील भाडे ६,३४० रुपयांवरून ६,४९९ रुपये, तर नागपूर-दिल्ली मार्गावरी ते ३५० रुपयांच्या आसपास असल्याचे सांगण्यात येत आहे. मार्गाचे अंतर आणि विमान प्रवासाच्या स्वरूपानुसार शुल्कातच्या वाढीचा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. एप्रिलमध्ये जाहीर करण्यात आलेल्या शुल्काच्या तुलनेत आंतरराष्ट्रीय विमान प्रवासासाठी फ्युएल सरचारिमतीच्या पार्श्वभूमीवर करण्यात आली आहे. त्यामुळे परदेश प्रवासाचे नियोजन करणाऱ्या प्रवाशांना तिकीट खर्चाचा नव्याने विचार करावा वाजून १ मिनिटापासून करण्यात आलेल्या नवीन बुकिंगला लागू होणार आहे. त्यामुळे त्यापूर्वी तिकीट बुक केलेल्या प्रवाशांना वाढीव फ्युएल सरचार्जखी वाढण्याची शक्यता आहे. आठवड्याच्या अखेरीस काही मार्गांवरील तिकीट दर १५ हजार रुपयांच्या पुढे जाण्याची शक्यता ट्रॅव्हल एजंट्सनी व्यक्त केली आहे. ऐन सणाच्या काळात काही मार्गांवर तिकीट दर २० हजार रुपयांपर्यंत पोहोचू शकतात, असा अंदाजही व्यक्त करण्यातल भाडे ६,८४३ रुपयांवरून ७,१५८ रुपये झाले आहे. देशांतर्गत मार्गांवरील फ्युएल सरचार्जमध्ये प्रत्यक्ष वाढ १०० ते ३५० रुपयांच्या आसपास असल्याचे सांगण्यात येत आहे.देशांतर्गत प्रवाशांच्या तुलनेत आंतरराष्ट्रीय विमान प्रवाशांना फ्युएल सरचार्जच्या वाढीचा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. एप्रिलमध्ये जाहीर करण्यात आलेल्या शुल्काच्या तुलनेत आंतरराष्ट्रीय विमान प्रवासासाठी फ्युएल सरचार्जमध्ये प्रति सेक्टर तब्बल २,५०० रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली आहे. इंडिगोकडून करण्यात आलेली ही वाढ इंधनाच्या वाढलेल्या किमतीच्या पार्श्वभूमीवर करण्यात आली आहे.फ्युएल सरचार्जमध्ये करण्यात आलेली सुधारणा मंगळवारी मध्यरात्री १२ वाजून १ मिनिटापासून करण्यात आलेल्या नवीन बुकिंगला लागू होणार आहे. त्यामुळे त्यापूर्वी तिकीट बुक केलेल्या प्रवाशांना वाढीव फ्युएल सरचार्ज भरावा लागणार नाही. दरम्यान, दसरा आणि दिवाळीच्या पार्श्वभूमीवर विमान प्रवाशांची मागणी वाढत असल्याने तिकीट दर आणखी वाढण्याची शक्यता आहे. आठवड्याच्या अखेरीस काही मार्गांवरील तिकीट दर १५ हजार रुपयांच्या पुढे जाण्याची शक्यता ट्रॅव्हल एजंट्सनी व्यक्त केली आहे. ऐन सणाच्या काळात काही मार्गांवर तिकीट दर २० हजार रुपयांपर्यंत पोहोचू शकतात, असा अंदाजही व्यक्त करण्यात आला आहे.

## यारी रोड-लोखंडवाला बॅक रोड जंक्शन येथील उड्डाणपुलाचे काम डिसेंबर २०२७ पर्यंत पूर्ण करा



* अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांचे निर्देश
* प्रकल्प स्थळाची अभिजीत बांगर यांनी केली पाहणी

**मुंबई,प्रतिनिधी:**पश्चिम विभागातील अंधेरी (पश्चिम) येथील यारी रोड आणि लोखंडवाला बॅक रोड जंक्शन, अमरनाथ टॉवर इमारतीजवळ बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने उड्डाणपूल बांधण्याचे काम सुरू आहे. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) श्री. अभिजीत बांगर यांनी प्रत्यक्ष प्रकल्पस्थळास भेट देऊन पाहणी केली. तसेच, पूल प्रकल्पाच्या प्रगतिचा आढावा घेतला. या पुलाचे बांधकाम डिसेंबर २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश श्री. बांगर यांनी दिले. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियोजन आराखड्यानुसार अंधेरी (पश्चिम) येथील कवठे खाडीच्या पूर्व आणि पश्चिम बाजूस १८.३० मीटर रुंदीचा विकास नियोजन रस्ता प्रस्तावित आहे. मात्र, कवठे खाडीमुळे रस्ता विकसित करण्याच्या कामात अडथळा निर्माण होत असल्याने नियोजित रस्ता पूर्ण करण्याच्या दृष्टीने या खाडीवर पूल उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. प्रस्तावित पुलामुळे यारी रोड, पंचमार्ग, वेसावे परिसराचा सरदार वल्लभभाई पटेल नगर (अंधेरी पश्चिम), लोखंडवाला संकुल आणि समर्थनगर या परिसरांशी थेट संपर्क प्रस्थापित होण्यास मदत होणार आहे.

या पुलाची एकूण लांबी २०६ मीटर असून तो कवठे खाडीवरून जाणार आहे. यामध्ये सरदार वल्लभभाई पटेल नगरच्या बाजूचा जोडमार्ग ४० मीटर, तर अमरनाथ टॉवरच्या बाजूचा जोडमार्ग ५६ मीटर आहे. मुख्य पुलाची लांबी ११० मीटर असून पुलाची रुंदी ११ मीटर आहे. जोडमार्ग आणि मुख्य पुलाच्या भागाची रुंदी समान ठेवण्यात आली आहे. पुलाच्या अधिसंरचनेसाठी ११० मीटर लांबीचा एकेरी पल्ल्याचा पोलादी बास्केट हँडल आर्च' सांगाडा प्रस्तावित करण्यात आला आहे. या पोलादी कमानीसाठी ताणताऱ्यांचा वापर करण्यात येणार असून ते पुलाच्या डेक स्लॅबला संलग्न केले जातील. पुलाच्या अधोरचनेसाठी प्रबलित सिमेंट काँक्रीटची आधार भिंत आणि आधारमुकुट प्रस्तावित करण्यात आले आहेत. पुलाच्या पायाभरणीसाठी प्रबलित सिमेंट काँक्रीट पायाभरणी करण्यात आली आहे.या पुलामुळे वेसावे परिसरातील नागरिकांच्या दैनंदिन प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच, परिसरातील वाहतूक कोंडी कमी होऊन पूर्व - पश्चिम दिशेतील वाहतूक संपर्क अधिक सक्षम होणार आहे. आगामी वेसावे - वांद्रे सागरी सेतू आणि मुंबई किनारा रस्ता प्रकल्प (उत्तर) सुरू झाल्यानंतर हा पूल पर्यायी मार्ग म्हणूनही उपलब्ध होणार आहे. सद्यस्थितीत या परिसरातून प्रवासासाठी लागणारा सुमारे ३० मिनिटांचा कालावधी कमी होऊन तो सुमारे १० मिनिटांपर्यंत येण्याची शक्यता आहे. त्यामुळे या महत्त्वपूर्ण प्रकल्पामुळे वेसावे, यारी रोड, लोखंडवाला आणि लगतच्या परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, परिसरातील वाहतूक व्यवस्थेत लक्षणीय सुधारणा होण्यास मदत होणार आहे.

## चुकीने दिलेला अतिरिक्त पगार कर्मचाऱ्यांकडून वसूल केला जाऊ शकतो: सुप्रीम कोर्टाने फेटाळली शिक्षकांची याचिका

**मुंबई,प्रतिनिधी:** चुकीने दिलेला अतिरिक्त पगार कर्मचाऱ्यांकडून वसूल केला जाऊ शकतो, कारण रक्कम परत करण्याचे लेखी हमीपत्रच संबंधितांनी दिले होते. त्यामुळे ही वसुली कायदेशीर ठरते, असे स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती शील नागू यांच्या खंडपीठाने केरळमधील कालिकत येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (मधील शिक्षकांना चुकीच्या पद्धतीने देण्यात आलेले अकॅडेमिक ग्रेड पे'चे लाभ वसूल करण्याच्या निर्णयावर नुकतेच शिक्कामोर्तब केले. तसेच केरळ उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिकाही खंडपीठाने फेटाळून लावली आहे.

संबंधित शिक्षकांना ऑक्टोबर २००९ मध्ये अकॅडेमिक ग्रेड पे' अंतर्गत आर्थिक सवलती आणि लाभ लागू करण्यात आले होते. मात्र, पदोन्नती किंवा या लाभासाठी आवश्यक तितक्या वर्षांची सेवा पूर्ण झाली नसल्याचे कारण पुढे करत प्रशासनाने जानेवारी २०१० मध्ये अवघ्या काही महिन्यांतच हे लाभ अचानक मागे घेतले. प्रशासनाच्या या कारवाईविरुद्ध शिक्षकांनी केरळ उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती. नोव्हेंबर २०१४ मध्ये उच्च न्यायालयाच्या एकलपीठाच्या न्यायाधीशांनी शिक्षकांच्या बाजूने कौल देत प्रशासनाचा निर्णय रद्द केला आणि याचिका मंजूर केल्या.

कालिकत येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी संस्थेने या निर्णयाविरोधात दाखल झालेल्या अपिलावर सुनावणी करताना नोव्हेंबर २०१५ मध्ये उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने एकलपीठाच्या न्यायाधीशांचा निकाल रद्द केला. शिक्षकांनी न्यायालयात युक्तिवाद करताना सांगितले की, हे प्रकरण रफीक मसिह' खटल्यातील परिच्छेद १८ मधील ५ व्या नियमानुसार स्पष्टपणे बसते. या नियमानुसार, प्रशासनाकडून झालेली वसुली ही अन्यायकारक, अत्यंत कठोर किंवा मनमानी स्वरूपाची असेल, तसेच कर्मचाऱ्यावर होणारा अन्याय हा मालकाच्या पैसे वसूल करण्याच्या अधिकारापेक्षा अधिक गंभीर ठरत असेल, तर अशा परिस्थितीत कर्मचाऱ्याकडून रक्कम वसूल करण्यास कायद्याने पूर्ण मनाई आहे.

# संपादकीय

## मराठवाड्याच्या मातीतून देशाच्या शेतासाठी नवे वाण

मराठवाडा म्हटले की डोळ्यांसमोर येते ती पावसाची अनिश्चितता, कोरडवाहू शेती, पाण्याची टंचाई आणि त्यातून निर्माण होणारी शेतकऱ्यांची धडपड. मात्र याच प्रतिकूल परिस्थितीत संशोधनाची मशाल तेवत ठेवून शेतीला नवी दिशा देण्याचे काम मराठवाड्यातील कृषी विद्यापीठे आणि संशोधन केंद्रे करीत आहेत. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने विकसित केलेल्या सहा पिकांच्या वाणांना केंद्रीय स्तरावर मिळालेली मान्यता ही केवळ विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांची उपलब्धी नाही, तर मराठवाड्याच्या कृषी संशोधनाची देशपातळीवर उमटलेली मोहोर आहे.

सोयाबीनचा एमएयूएस ८२४, कपाशीचे एनएच २२०३७ बीटी आणि एनएच २२०३८ बीटी, ज्वारीचा परभणी सुपर दगडी', तिळाचा टीएलटी ७ आणि चवळीचा परभणी पद्मा' या सहा वाणांना केंद्रीय स्तरावर मान्यता मिळणे ही बाब विशेष महत्त्वाची आहे. कारण या मान्यतेमागे केवळ प्रयोगशाळेतील संशोधन नाही, तर शेताच्या बांधावर तपासलेली उत्पादकता, रोगप्रतिकारक क्षमता, हवामानाशी जुळवून घेण्याची ताकद आणि शेतकऱ्याला मिळू शकणारा आर्थिक फायदा यांचा कस लागलेला असतो. त्यातून मराठवाड्यातील संशोधनाची उपयुक्तता स्पष्ट होते.विशेषतः एमएयूएस ८२४ या सोयाबीन वाणाची कामगिरी लक्षवेधी आहे. ईशान्य पर्वतीय राज्यांमध्ये लागवडीसाठी या वाणाची शिफारस झाली आहे. आसाम, मणिपूर, नागालँड, अरुणाचल प्रदेश आणि मेघालय अशा भिन्न हवामानाच्या राज्यांपर्यंत मराठवाड्यात विकसित झालेले वाण पोहोचणे ही संशोधनाच्या दृष्टीने मोठी बाब आहे. या वाणाची सरासरी उत्पादकता हेक्टरी २३.२९ क्विंटल असून, सर्वोत्तम तुलनात्मक वाणापेक्षा ती १०.४ टक्क्यांनी अधिक आहे. तेल उत्पादनातही त्याची कामगिरी सरस आहे. मोठ्या आकाराचे बियाणे आणि करपा व गंज रोगाला असलेली मध्यम प्रतिकारक्षमता यामुळे शेतकऱ्यांसाठी त्याचे महत्त्व वाढते.मराठवाड्याच्या दृष्टीने या यशाचा आणखी एक अर्थ आहे. शेतीसमोरील संकटे केवळ पाऊस कमी पडण्यापुरती मर्यादित राहिलेली नाहीत. बदलते हवामान, वाढते तापमान, पिकांवरील रोग-किडींचा वाढता प्रादुर्भाव, उत्पादन खर्चातील वाढ आणि बाजारातील अनिश्चितता या सगळ्यांचा सामना शेतकऱ्याला करावा लागत आहे. अशा वेळी संशोधनातून विकसित होणारे वाण हे शेतकऱ्याच्या हातातील महत्त्वाचे साधन ठरू शकते. कमी जोखमीमध्ये अधिक उत्पादन देणारी, बदलत्या हवामानाला तोंड देणारी आणि बाजाराच्या गरजेशी सुसंगत पिके ही भविष्यातील शेतीची गरज आहे.

कपाशीच्या एनएच २२०३७ बीजी २ आणि एनएच २२०३८ बीजी २ या वाणांची महाराष्ट्रासह गुजरात आणि मध्य प्रदेशासाठी झालेली नोंदही याच दृष्टीने महत्त्वाची आहे. मराठवाड्यातील कपाशी उत्पादकांसाठी कपाशी हे केवळ पीक नसून मोठ्या प्रमाणावर ग्रामीण अर्थव्यवस्थेला आधार देणारे पीक आहे. त्यामुळे स्थानिक हवामान आणि शेतीच्या परिस्थितीचा अभ्यास करून विकसित केलेले वाण शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. ज्वारीच्या परभणी सुपर दगडी' या वाणाची महाराष्ट्रासाठी झालेली शिफारसही कोरडवाहू शेतीच्या दृष्टीने आश्वासक आहे. तिळाचा टीएलटी ७ आणि चवळीचा परभणी पद्मा' या वाणांमुळे तेलबिया आणि कडधान्यांच्या उत्पादनालाही नवी संधी मिळू शकते.

मात्र नवीन वाणाला केंद्रीय मान्यता मिळणे हा प्रवासाचा शेवट नसून खरा कस त्यानंतर लागतो. संशोधन केंद्रातून शेतकऱ्याच्या शेतापर्यंत वाण पोहोचण्यासाठी दर्जेदार बियाण्याची उपलब्धता, त्याचा पुरेसा प्रसार, कृषी विभागाचे मार्गदर्शन आणि प्रत्यक्ष प्रात्यक्षिके यांची गरज असते. उत्तम वाण संशोधन केंद्राच्या नोंदीत राहिला आणि शेतकऱ्याला त्याचे बियाणेच मिळाले नाही, तर संशोधनाचा सामाजिक आणि आर्थिक उपयोग मर्यादित राहतो. त्यामुळे विद्यापीठाने विकसित केलेल्या वाणांच्या मोठ्या प्रमाणावर बीजोत्पादनाला आणि शेतकरी पातळीवरील प्रसाराला तेवढेच महत्त्व मिळायला हवे.या यशामागे अनेक वर्षांचे सातत्यपूर्ण संशोधन आहे.

'सह्याद्री'च्या कुशीत

संयोजक: श्री प्रकाश जडे

# विरहाचे दोन रंग...

कविता शिकवायची म्हटलं की माझं मन त्या वाचलेल्या कवितेच्या मध्यवर्ती कल्पनेवर विचार करू लागतं. आपल्यासमोर असलेल्या मुलांना त्यांच्या वयोगटाला समजेल अशा भाषेमध्ये कविता त्यांच्यापर्यंत पोहोचवायची असते.



कवितेतला केवळ अर्थ पोहोचवण्यापेक्षा कवीची मनोभूमी,त्या मनोभूमीतून झालेली कवितेतील शब्दांची निवड, कवितेमध्ये वापरलेल्या प्रतिमा आणि प्रतिके, आणि हे सगळं विद्यार्थ्यांच्या संवेदनेत उतरवणं, त्यांच्या मनाच्या खोल कप्प्यात त्यातील भाव आणि विचार पेरण्याचा प्रयत्न करणं, हा माझा उद्देश असतो.

अशाच दृष्टिकोनातून मी थॉमस हार्डी यांची Neutral Tones ही कविता वाचत होते. कविता वाचून संपली आणि अचानक मनात एक गाणं तरळून गेलं-दिल के अरमाँ आँसुओं में बह गए... कित्येक वर्षांपूर्वी ऐकलेलं, तरी मनाच्या कुठल्यातरी कप्प्यात अजूनही ताजं असलेलं हे गाणं. अगदी पूर्वीपासून मला हे गाणं आवडत होतं आणि एकदा ते स्टेजवर म्हटल्यामुळे पाठही होतं. हार्डींच्या कवितेतील थंड, उदास वातावरण आणि त्या गाण्यातील आर्त स्वर यांच्यात मला एक अनोखा भावबंध जाणवला. कविता शिकवून पूर्ण झाल्यानंतर मी मुलांना हे गाणं ऐकवलं. या गाण्याचा संदर्भ Neutral Tones या कवितेला जोडून दिला. त्यामुळे विद्यार्थी अधिक मन लावून त्या कवितेकडेही पाहू लागले. हे सगळं झाल्यावरही ते गाणं मनातून काही केल्या जाईना. मग वाटलं, इतक्या वर्षांत आपल्याला कधी 'निकाह' फिल्म पाहणं जमलं नाही. गाणं आवडतं म्हणून तरी आता आपण ही फिल्म पहावी. केवळ गाण्यासाठी नव्हे, तर त्या वेळी मनाने या कवितेशी त्याची सांगड का घातली, हे स्वतःलाच समजून घेण्यासाठी वेळ नसताना, वेळ काढून मी ही फिल्म पाहिली.

Neutral Tones या कवितेमध्ये हार्डी एका संपलेल्या प्रेमसंबंधाकडे मागे वळून पाहतो. कवितेच्या सुरुवातीलाच हिवाळ्याची एक उदास संध्याकाळ तो डोळ्यांसमोर उभी करतो. फिकट झालेला सूर्य, उपासमार झालेली जमीन, काळवंडलेली पाने, असा निसर्गाचा सारा परिसरच जणू आपले रंग गमावून बसला आहे. त्या वातावरणात दोन माणसं समोरासमोर उभी आहेत; पण त्यांच्यामधील जिव्हाळा, आणि आपलेपणा मात्र हरवून गेला आहे. प्रेम कधीकाळी होतं, पण आता त्याची ऊब उरलेली नाही. उरलं आहे ते एक विचित्र शांत अंतर. म्हणूनच Neutral Tones हे नाव मनाला खोलपर्यंत भिडतं.ज्या नात्यात प्रेम, आपुलकी, विश्वास आणि भावनिक ऊब असायला हवी होती, ते नातं आता या starved soil सारखं झालं आहे. मातीसाठी कवीने 'उपासमार झालेली माती' असे विशेषण वापरले आहे. प्रेमाचा जीवनरस आटला आहे. म्हणूनच त्या नात्यात नवीन पालवी फुटण्याची शक्यता नाही. कवीला कविता लिहीत असताना एखादी प्रतिमा, एखादी कल्पना एकदम चपखल त्या क्षणाला सुचणं म्हणजे निर्मितीतलं एक अद्भुत रसायनच असतं. ती प्रक्रिया सहजासहजी उलगडता येत नाही.Starved हा शब्द भावनिक उपासमार सूचित करतो. एखाद्या नात्यात माणूस जवळ असूनही प्रेमासाठी, समजून घेण्यासाठी, जिव्हाळ्यासाठी उपाशी राहू शकतो. अशा वेळी नातं बाहेरून अस्तित्वात असतं, पण आतून त्याची जमीन वांझोट्या मातीसारखी होते. नेमक्या याच ठिकाणी मला दिल के अरमाँ आँसुओं में बह गए... हे गाणं आठवलं होतं. गाण्याचा भाव ऐकताना मात्र माझ्या मनातला विरह अश्रूंनी ओला झाला होता. 'निकाह' मधील या गीताचा संदर्भ फक्त दोन प्रेमिकांच्या दुराव्याचा नाही. विवाह, संसार, नात्यांमधील ताण, तुटलेल्या अपेक्षा आणि स्त्रीच्या मनात उभ्या राहिलेल्या भविष्याच्या स्वप्नांचा झालेला भंग, इ. सगळ्या अनुभवांचा त्यात एकत्रित आविष्कार आहे. मनाने एखाद्या नात्याभोवती जे आयुष्य उभं केलं होतं, तेच आयुष्य हातातून निसटून गेल्याची वेदना या गीतात आहे. म्हणूनच अरमाँ' हा शब्द मनात खोलवर उतरतो. विवाह बंधन तुटतं म्हणजे केवळ आपण एखाद्या व्यक्तीला गमावत नाही; आपण त्या व्यक्तीबरोबर जगायचं ठरवलेलं एक संपूर्ण भविष्य गमावतो हा अर्थ या गाण्याच्या शब्दरचनेत तर आहेच आणि तितकाच तो गाण्याच्या आर्त स्वरांमध्येही आहेदोन्हींची पार्श्वभूमी वेगळी आहे. 'निकाह' मध्ये वैवाहिक नात्याची गुंतागुंत आहे; सामाजिक चौकट आहे; एका स्त्रीच्या आयुष्याशी, तिच्या प्रतिष्ठेशी आणि भविष्याच्या स्वप्नांशी जोडलेला प्रश्न आहे. हार्डींच्या कवितेत मात्र एका प्रेमसंबंधाचा भावनिक शेवट आणि त्यातून आलेली कटू जाणीव आहे. म्हणून दोन्हींच्या कथांना किंवा प्रसंगांना एकाच मापाने मोजणं योग्य ठरणार नाही. पण शेवटी प्रश्न मनात तसाच होता की Neutral Tones वाचताना मला ते गाणं आठवलंच कसं?बहुधा त्याचं कारण असं असावं की कथानक समान नसतानाही वेदनेचा सूर समान असू शकतो. आपण एखादी कविता वाचतो तेंव्हा तिच्यातले शब्दच केवळ आपल्याशी बोलत नाहीत; आपल्या आत साठलेल्या आठवणीही त्या अर्थाशी बोलू लागतात. हार्डींच्या कवितेतील थंड हवा, फिकट सूर्य, काळवंडलेली पानं आणि दोन माणसांमधील नात्याची संपलेली ऊब वाचताना माझ्या मनाने त्या दृश्याचा अर्थ एका गाण्याच्या माध्यमातून पकडला. Neutral Tones मध्ये विरहाचा रंग बाहेरच्या निसर्गावर उतरलेला दिसतो; दिल के अरमाँ...मध्ये तोच विरह मनातून अश्रू बनून बाहेर येतो. एका ठिकाणी निसर्ग रंगहीन होतो, तर दुसऱ्या ठिकाणी मन ओलंचिंब होतं. विरहाच्या या दोन वेगवेगळ्या अवस्था आहेत.गमावलेल्या व्यक्तीबरोबर माणूस आपली स्वप्नंही गमावतो आणि त्या स्वप्नांचा शोक करत राहतो.



डॉ.सुनंदा शेळके, बारामती

'निकाह' मधील गाणं आपल्याला याच अवस्थेच्या जवळ घेऊन जातं. दिल के अरमाँ आँसुओं में बह गए म्हणताना मन अजूनही त्या हरवलेल्या स्वप्नांना कवटाळू पहात असतं. त्या स्वप्नांचा अंत झाला आहे, हे कळतं; पण मन त्यांच्यापासून पूर्णपणे मुक्त झालेलं नसतं.काही विरह मात्र यापेक्षा वेगळे असतात. अश्रू आटतात. आठवणींची तीव्रता कमी होते. राग निवतो. आणि एक दिवस आपण मागे वळून पाहतो, तेंव्हा त्या नात्याबद्दल प्रेमापेक्षा त्यातून मिळालेली दुःखद जाणीव अधिक ठळक दिसू लागते. Neutral Tones मधील विरह मला अशा अवस्थेतला वाटतो. हार्डींच्या कवितेत आक्रोशापेक्षा शांतता आहे; पण ती शांतता सुखाची नाही. ती खूप काही अनुभवल्यानंतर आलेली थंड शांतता आहे. म्हणून त्याच्या कवितेतील हिवाळा केवळ ऋतू राहत नाही; तो उदास आणि गोठलेल्या मनाचा ऋतू बनतो.नातं तुटणं म्हणजे काही फक्त दोन माणसांनी एकमेकांपासून दूर जाणं नसतं. आपण त्या नात्याभोवती मनात उभं केलेलं एक छोटंसं जगही त्याबरोबर तुटत असतं. उद्याचे दिवस, एकत्र साजरे करायचे सण, काही साधेसे रविवार, एखादा प्रवास, आजारपणातली सोबत, वय वाढताना एकमेकांच्या शेजारी असण्याची कल्पना, या सगळ्या गोष्टी आपण कदाचित कधी स्पष्टपणे बोलून दाखवत नाही; पण त्या मनात कुठेतरी रुजलेल्या असतात. म्हणून नातं संपलं की कधी-कधी व्यक्तीच्या विरहापेक्षा न जगलेल्या भविष्याचा विरह अधिक बोचतो.निकाहच्या गीतात या न जगलेल्या भविष्याचे अश्रू ऐकू येतात. हार्डींच्या कवितेत मात्र त्याच प्रकारच्या हरवण्याची राख झालेली शांतता दिसते.एकीकडे अश्रू आहेत, दुसरीकडे रंगहीनता. एकीकडे मन अजूनही म्हणतं, माझी स्वप्नं वाहून गेली; दुसरीकडे मन जणू म्हणतं, त्या स्वप्नांनी मला काही शिकवलं. किती विलक्षण आहे मानवी मन! एखाद्या दुःखाच्या अगदी पहिल्या क्षणी आपण त्यापासून सुटू पाहतो. मग त्याला शब्द देतो, अश्रू देतो, गाणं देतो. काळ पुढे जातो आणि तेच दुःख हळूहळू आपल्या स्मृतीचा भाग बनतं. त्याची धार कमी होते, पण त्याचा अर्थ वाढत जातो. एखाद्या दिवशी जुनं गाणं ऐकताना किंवा एखादी कविता वाचताना आपण पुन्हा त्या भावनेच्या जवळ जातो; मात्र यावेळी आपण त्या दुःखात बुडत नाही, त्याकडे थोडं दूर उभं राहून पाहू शकतो. त्या सगळ्यांतून आपण स्वतःबद्दल जे काही शिकतो, ते मात्र आपल्या आत राहून जातं. म्हणूनच Neutral Tones वाचताना मला निकाहमधील ते गाणं आठवलं असावं.



अंतर्नाद

# दुष्काळावर मात:हवी सर्वांची साथ...

महाराष्ट्रात पावसाचा खंड आणि पिकांचे नुकसान पाहून राज्य शासनाने २६५ तालुक्यांमध्ये ट्रिगर-१ नुसार दुष्काळसदृष्य परिस्थिती जाहिर करुन त्या भागातील दुष्काळावर मात करण्यासाठी १२ उपाययोजनांची अंमलबजावणी सुरु केली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील दुष्काळाच्या छायेत असलेल्या शेतकरी-नागरिकांना सहाय्य करुन दुष्काळावर मात करायची आहे यासाठी सर्वांची भक्कम साथ अत्यंत महत्त्वाची आहे.महाराष्ट्रातील शेती आणि शेतकरी हा प्रामुख्याने निसर्गाच्या कृपेवर आधारीत पावसावर अवलंबून आहे. आपल्या राज्यातील शेतीमध्ये कोरडवाहू शेती अधिक प्रमाणात केली जात असल्याचे आपल्या लक्षात येते. शेती ही पुर्णपणे पावसावर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांना कधी कधी निसर्ग ही कृपादृष्टी करीत नाही व नैसर्गिक संकट निर्माण होते आणि आपला बळीराजा दुष्काळासारख्या संकटात आणि चक्रव्यूहात अडकला जातो. अशीच काही बिकट परिस्थिती यंद्याच्या खरीप हंगामा पासून आपल्या समोर येऊन ठेपली आहे. पावसाचे प्रमाण, पावसातील तूट आणि पाऊस पडण्यातील मोठा खंड यावर आधारित ट्रिगर-१ म्हणजे प्रथम कळ लागू करण्यात आली आहे. दुष्काळ जाहिर करण्याच्या प्रक्रियेतील ही पहिली पायरी आहे.

### शेतकऱ्यांना कोणत्या सवलती?

ट्रिगर-१ लागू झाल्यानंतर दुष्काळग्रस्त भागातील नागरिक आणि शेतकऱ्यांना विविध सवलती व उपाययोजना लागू करता येतात. मात्र, या सवलती आपोआप सर्वांना मिळतात असे नाही. संबंधित विभागांकडून शासन निर्णयानुसार त्यांची अंमलबजावणी केली जाते. त्यानुसार दुष्काळ सदृष्य पारिस्थिती जाहिर झालेल्या भागात खालीलप्रमाणे १२ उपाययोजना राबविण्यास प्राधान्य देण्यात आले आहे.(१) जमीन महसुलात सवलत : दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना जमीन महसुलात सवलत देण्याची तरतूद आहे. (२) पीक कर्जाचे पुनर्गठन : शेतकऱ्यांच्या पीक कर्जाचे पुनर्गठन करण्याची प्रक्रिया केली जाऊ शकते. (३) कर्जवसुलीस स्थगिती : शेती कर्जाच्या वसुलीला ठरावीक कालावधीसाठी स्थगिती देता येते. (४) वीजबिलात सवलत : दुष्काळग्रस्त भागातील कृषीपंपांच्या वीजबिलाबाबत सवलतीच्या उपाययोजना करता येतात. (५) परीक्षा शुल्कमाफी : दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कातून सवलत किंवा माफी देण्याची तरतूद आहे. (६) टँकरने पाणीपुरवठा : पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्यास टँकरद्वारे पाणीपुरवठा करता येतो. (७) चारा उपलब्धता : पशुधनासाठी चारा उपलब्ध करून देण्यासाठी चारा छावण्या किंवा अन्य उपाययोजना करता येतात. (८) रोजगाराच्या कामांना चालना : दुष्काळग्रस्त भागात रोजगार हमी योजनेअंतर्गत गरजेनुसार कामे सुरू करता येतात. (९) पिण्याच्या पाण्याला प्राधान्य : उपलब्ध पाणीसाठ्यातून पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्याची व्यवस्था केली जाते. (१०) पाणीपुरवठा योजनांची दुरुस्ती : पाणीपुरवठा योजनांच्या तातडीच्या दुरुस्तीला प्राधान्य दिले जाऊ शकते. (११) वीजपुरवठा खंडित न करण्याच्या उपाययोजना : दुष्काळग्रस्त भागातील पाणीपुरवठा योजनांचा वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी विशेष उपाय करता येतात. (१२) पीक नुकसानीसाठी स्वतंत्र मदत : पीक नुकसानभरपाई ही ट्रिगर-१ लागू झाल्याने थेट मिळत नाही. त्यासाठी पीक नुकसानीचे पंचनामे आणि शासनाने निश्चित केलेले मदतीचे स्वतंत्र निकष लागू राहतात. नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या पीक नुकसानीसाठी मदत देण्याची स्वतंत्र प्रक्रिया मदत व पुनर्वसन विभागाने नमूद केली आहे.राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय घेत दुष्काळ जाहीर केला आहे. राज्यातील २६५ तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुक्यात दुष्काळ, याचा अर्थ ७५ टक्के महाराष्ट्रात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. या निर्णयामुळे दुष्काळाची दाहकता अनुभवत असलेल्या शेतकरी आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रातील ७५ टक्के भागात दुष्काळ जाहीर झाल्याने आता दुष्काळाच्या विविध उपाययोजना जाहीर होऊन त्यांची अंमलबजावणी केली जात आहे. त्यावर पंचनाम्याची कार्यवाही तात्काळ पूर्ण करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

### ट्रिगर-१ म्हणजे काय?

महाराष्ट्रातील संभाव्य दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्यासाठी ट्रिगर-१ हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. एखाद्या भागात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे का, हे तपासण्यासाठी शास्त्रीय निकषांवर आधारित तीन टप्प्यांच्या मूल्यमापनातील हा पहिला टप्पा आहे. महाराष्ट्र शासनाच्या जून २०१८ मधील सुधारित शासननिर्णयानुसार, मान्सून कालावधीत ७५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झालेल्या किंवा पावसाचा प्रदीर्घ खंड पडलेल्या भागात दुष्काळ व्यवस्थापनातील पहिली धोक्याची सूचना म्हणून ट्रिगर-१ लागू केला जातो. ट्रिगर-१ लागू झाला म्हणजे थेट पूर्ण दुष्काळ घोषित होत नाही. यानंतर प्रशासकीय पातळीवर दुष्काळ निवारणाची प्रक्रिया सुरू होते.ट्रिगर-१ च्या अहवालानंतर राज्य शासन प्रभावित तालुक्यांमध्ये पिण्याचे पाणी, चारा छावण्या, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची (मनरेगा) कामे आणि शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत देण्याचा मार्ग मोकळा करते. शासकीय नियमांनुसार, ट्रिगर-१ ची अंमलबजावणी झाल्यानंतर पुढील टप्प्यात उपग्रह निर्देशांक, जमिनीतील ओलावा आणि भूजल पातळी यांसारख्या घटकांचे मूल्यांकन करून ट्रिगर-२ चा आढावा घेतला जातो. त्यानंतर निवडक गावांमध्ये प्रत्यक्ष पीक पंचनामे करून शासनाने ठरवून दिलेल्या टक्केवारीपेक्षा जास्त नुकसान आढळल्यास ती गावे अधिकृतपणे दुष्काळ घोषित करण्यास पात्र ठरतात.राज्यातील अनेक भागांत पावसाने मोठा खंड दिल्याने अनेक भागांमध्ये पिकांवर परिणाम झाला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाकडून दुष्काळसदृश परिस्थितीचा प्राथमिक आढावा घेतला जात आहे. पाहणी दौरा केला जात आहे. दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडून पंचनाम्याचे आदेश देण्यात आले असून त्रिस्तरीय समिती पंचनामे करणार आहे. या समितीमध्ये तलाठी,कृषी सहायक व ग्रामसेवक यांचा समावेश असून ते गाव पातळीवर पंचनामे करणार असल्याची माहिती आहे.

### २६५ तालुके दुष्काळाच्या छायेत

पश्चिम विदर्भ म्हणजे अमरावती विभागात ५ जिल्हे येतात. त्यानूसार सर्व ५६ तालुके दुष्काळाच्या छायेत आले आहेत त्यामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद, संग्रामपूर, चिखली, देऊळगावराजा, मेहकर, बुलडाणा, सिंदखेडराजा, लोणार, खामगाव, शेगाव, मलकापूर, मोताळा व नांदुरा; अमरावती जिल्ह्यातील अमरावती, भातुकली, चांदूर रेल्वे, नांदगाव खं., धामणगाव रेल्वे, अचलपूर, अंजनगावसुर्जी, तिवसा, धारणी, चिखलदरा, वरूड, मोर्शी, चांदूरबाजार व दर्यापूर; अकोला जिल्ह्यातील अकोट, अकोला, पातूर, तेल्हारा, मुर्तीजापूर, बाळापूर व बार्शीटाकळी; वाशिम जिल्ह्यातील वाशिम, रिसोड, मालेगाव, मंगळूरपीर, कारंजा व मानोरा; तसेच यवतमाळ जिल्ह्यातील यवतमाळ, बाभुळगाव, कळंब, दारव्हा, दिग्रस, आर्णी, नेर, पुसद, उमरखेड, महागाव, वणी, मारेगाव, झरी-जामणी, केळापूर, घाटंजी व राळेगाव या तालुक्यांचा समावेश आहे. या सर्व ५६ तालुक्यांना प्रथम कळ (ट्रिगर -१) लागू करण्यात आला आहे. याप्रमाणे राज्यातील २६५ तालुके समाविष्ट आहेत.दुष्काळी परिस्थितीत राज्यातील शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी आमच्या मदतीच्या केंद्रस्थानी आहे. त्यांना दिलासा देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जाणार आहेत. आम्ही शेतकरी बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. या आव्हानावर मात करण्यासाठी आपण सर्व एकजूटीने प्रयत्न करूया, असा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. या तालुक्यांतील शेतकरी, विद्यार्थी, शेतमजूर, नागरिक आणि पशुधनाला दिलासा देण्यासाठी बारा उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.पावसाअभावी शेतकऱ्यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. दुष्काळी परिस्थिती जाहीर झालेल्या तालुक्यांमध्ये तत्काळ सर्व्हेक्षण करावे लागणार आहे. यासाठी महसूल विभाग, कृषि तसेच संबंधित सर्व यंत्रणांनी संवेदनशीलतेने आणि समन्वयाने काम करावे. त्यासाठी क्षेत्रीयस्तरावर सुसंवाद आणि संपर्क ठेवावा. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी या कामाला प्राधान्य द्यावे, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले आहेत. सर्व्हेक्षण करताना पिकांची स्थिती दर्शवणारे छायाचित्र व जीपीएस कोऑर्डिनेटद्वारे पिक परिस्थितीचा अहवाल सादर केला जाणार आहे. राज्याचे कृषि आयुक्त यांनी खरीप २०२६च्या हंगामाचा आढावा घेऊन राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती असल्याचा अहवाल सादर केला. त्यामुळे आता या राज्यातील तालुक्यामध्ये जून ते आज पर्यंत या कालावधीतील पर्जन्याची तूट व अन्य घटकांनी प्रभावित झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थितीबाबत दुष्काळाबाबतच्या ढीळससशी- १ (प्रथम कळ) अनुषंगाने पंचनामे करण्यात येणार आहेत.

### मुख्यमंत्री व शासन बांधावर

महाराष्ट्रातील काही भागांमध्ये निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या अडचणींचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लातूर, धाराशिव,सोलापूर, वाशिम जिल्ह्यांचा दौरा केला. शेतांमध्ये जाऊन त्यांनी पिकांची पाहणी केली, शेतकरी आणि ग्रामस्थांशी संवाद साधला आणि त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव, मोताळा, अकोला जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यातील गावांना भेटी देऊन पाहणी केली आणि बळीराजाला धीर दिला.तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही शेतकऱ्यांच्या अडचणींबाबत संवेदनशीलता व्यक्त करीत बाधित भागांतील परिस्थिती जाणून घेण्यावर भर दिला आहे.

राज्यातील सध्याच्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी केवळ प्रशासकीय अहवाल आणि आकडेवारी पुरेशी नसते. शेताच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष परिस्थिती समजून घेणे, शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकणे आणि स्थानिक पातळीवरील अडचणी जाणून घेणे तितकेच महत्त्वाचे ठरते. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दौऱ्यात पिकांची स्थिती, पाण्याची उपलब्धता आणि शेतकऱ्यांसमोरील अडचणी यांचा प्रत्यक्ष आढावा घेण्यात आला. विशेषतः धाराशिव व वाशिम जिल्ह्यातील पाहणीदरम्यान शेतकऱ्यांच्या परिस्थितीची माहिती घेतल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी दुष्काळी परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी राज्य शासनाची भूमिका स्पष्ट केली.दुष्काळाच्या परिस्थितीत पिकांइतकाच महत्त्वाचा प्रश्न आहे तो पिण्याच्या पाण्याचा. त्यामुळे पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी या दौऱ्यादरम्यान स्पष्ट केले. त्याचबरोबर जनावरांसाठी चारा आणि पाण्याची व्यवस्था करण्यासोबतच शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबांसाठी अन्नधान्याची व्यवस्था केली जाणार आहे. दुष्काळाची झळ केवळ शेतीला बसत नाही, तर त्याचा परिणाम कुटुंबाच्या रोजच्या गरजांवरही होतो. त्यामुळे पाणी, चारा आणि अन्नधान्य या मूलभूत गरजांचा एकत्रित विचार करून उपाययोजना करणे आवश्यक आहे. मदत जाहीर झाल्यानंतर ती प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे तितकेच महत्त्वाचे असते. या दृष्टीने शेतकऱ्यांना थेट मदत त्यांच्या खात्यात जमा करण्यात येईल आणि शासन त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहील, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी दिला आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानीची दखल घेताना पीक विमा, आपत्ती निवारणाच्या तरतुदी आणि शासनाच्या विविध योजनांमधून उपलब्ध होणाऱ्या मदतीचाही विचार केला जात आहे. बाधित भागातील वस्तुस्थिती, पिकांचे नुकसान आणि स्थानिक परिस्थितीचा आढावा घेऊन पुढील मदतीबाबत निर्णय घेतले जात आहेत. अशा वेळी शेतकऱ्यांना उपलब्ध असलेली मदत वेळेत मिळणे आणि त्यासाठीची प्रशासकीय प्रक्रिया सुलभ राहणे महत्वाचे ठरते. शेतकरी हा महाराष्ट्राचा अन्नदाता आहे. त्याच्या कष्टाचा सन्मान करणे, त्याच्या संकटात त्याच्या पाठीशी उभे राहणे आणि त्याला पुन्हा उभारी देणे ही शासनाची जबाबदारी आहे. संकट कितीही मोठे असो, महाराष्ट्राचा शेतकरी एकटा नाही. राज्य शासन त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. फक्त यासाठी सर्वांची साथ हवी आहे.

-----------------

**अनिल आलुरकर**
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,अमरावती

## मिरांडा वॉर्निंगमध्ये जान्हवी किल्लेकर प्रमुख भूमिकेत

**मुंबई,प्रतिनिधी:**मालिका, चित्रपटातील अभिनयाद्वारे घरोघरी ओळख निर्माण केलेली अभिनेत्री जान्हवी किल्लेकर आता मिरांडा वॉर्निंग या चित्रपटात दिसणार आहे. अत्यंत रंजक भूमिकेतून जान्हवी प्रेक्षकांसमोर येणार असून, २७ नोव्हेंबर रोजी हा चित्रपट सर्वत्र प्रदर्शित होत आहे. सतनाम फिल्म्स स्टुडिओ आणि ओपन गेट मुव्हीज मार्फत मिरांडा वॉर्निंग या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे. सचिन धोत्रे यांनी चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन केले आहे तर अल्ट्रा मीडिया एंटरटेनमेंटच्या सुशीलकुमार अग्रवाल आणि सुकल्प चित्रच्या कल्पक जोशी यांनी या चित्रपटाची प्रस्तुती केली आहे. सचिन धोत्रे यांनी चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन केले आहे. त्यांनी या पूर्वी २०२३ मध्ये गेट-टुगेदर' या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं होतं. त्यानंतर मिरांडा वॉर्निंग' या चित्रपटातून त्यांनी वेगळा प्रयोग केला आहे. रवींद्र मठाधिकारी, सायली मठाधिकारी यांनी चित्रपटाचं लेखन केलं आहे.हेरिटेजवाडी नावाच्या फार्महाऊसवर एक खूनाची घटना उघडकीस येते आणि त्यानंतर एक थरारक शोध सुरू होतो, या शोधात काय काय घडतं याची रंजक गोष्ट मिरांडा वॉर्निंग या चित्रपटात पहायला मिळणार आहे. या चित्रपटात आदिनाथ कोठारे एका रफटफ पोलिस अधिकाऱ्याच्या भूमिकेत आहे. मराठी चित्रपटसृष्टीत सस्पेन्स, थ्रिलर प्रकारातील चित्रपटांचे या पूर्वी झाले आहेत. आता मिरांडा हाऊस या चित्रपटातून उत्कृष्ट कथानक, कसलेले कलाकार असलेली तांत्रिकदृष्ट्या सक्षम कलाकृती पहायला मिळणार आहे.भाग्य दिले तू मला'सारखा टीव्ही मालिका, सायको रंगा'सारख्या चित्रपटातून जान्हवीनं तिच्यातील अभिनेत्रीचं दर्शन घडवलं आहे. बिग बॉस या रिॲलिटी शोमधून तिची लोकप्रियता आणखी वाढली. आता जान्हवी पुन्हा एकदा सक्षम अभिनेत्री म्हणून मिरांडा हाऊस या चित्रपटाद्वारे प्रेक्षकांसमोर येत आहे. सस्पेन्स थ्रिलर चित्रपटात तिच्यासारख्या अभिनेत्रीचं असणं उत्सुकता वाढवणारं आहे. तिची भूमिका नेमकी काय आहे, या बद्दलही उत्सुकता वाढत आहे. त्यामुळे मिरांडा हाऊस चित्रपटाविषयीची सर्व उत्तरं मिळवण्यासाठी २७ नोव्हेंबरपर्यंत वाट पहावी लागणार आहे.

## ऑक्टोबर हीट वाढतेय! वीज बिल न वाढवता घर कसं ठेवाल थंड?

**मुंबई,प्रतिनिधी:** पावसाळा संपल्यानंतर आता वातावरणात अचानक उकाडा वाढू लागला आहे, ज्याला ऑक्टोबर हीट असे म्हणतात. या दिवसांत कडक ऊन आणि दमट हवामानामुळे घाम येणे, अस्वस्थ वाटणे आणि घरात राहणे सुद्धा कठीण होते. अशावेळी घरातला उकाडा कमी करण्यासाठी दिवसभर एसी किंवा पंखे सुरू ठेवावे लागतात, ज्यामुळे वीज बिलात प्रचंड वाढ होते. मात्र, काही सोप्या उपायांचा अवलंब करून घर नैसर्गिकरीत्या थंड ठेवू शकता.ऊन घरात येऊ नये म्हणून कडक ऊन सुरू होण्यापूर्वीच घरातील खिडक्या आणि दरवाजे बंद करा आणि त्यावर जाड पडदे किंवा ब्लॅकआउट कर्टन्स लावता येतील. यामुळे बाहेरची उष्ण हवा आणि सूर्यप्रकाश घरामध्ये प्रवेश करणार नाही. संध्याकाळी जेव्हा हवा थोडी थंड होईल, तेव्हा खिडक्या उघडून घरातील हवा खेळती ठेवू शकता. दमट आणि उष्ण हवा बाहेर जाण्यासाठी क्रॉस व्हेंटिलेशन गरजेचे आहे. यासाठी घरातील विरुद्ध दिशेच्या खिडक्या उघड्या ठेवा, जेणेकरून ताजी हवा आत येईल आणि उष्णता बाहेर जाईल.तापमान नैसर्गिकरीत्या कमी करण्यासाठी मनी प्लांट, स्नेक प्लांट किंवा अरेका पाम यांसारखी इनडोअर रोपे लावा. ही रोपे वातावरण थंड ठेवण्यास मदत करतात.घराच्या भिंतींना शक्यतो पांढरा किंवा फिकट पिवळा, हलका निळा यांसारखे फिकट रंग द्यावेत. हे रंग उष्णता शोषून घेण्याऐवजी ती परावर्तित करतात, ज्यामुळे घर जास्त तापत नाही.स्वयंपाक करताना किंवा बाथरुममध्ये वाफेमुळे उष्णता वाढते. अशा वेळी किचन आणि बाथरुममधील एक्झॉस्ट फॅन सुरू ठेवा, जेणेकरून घरातील गरम हवा आणि दमटपणा बाहेर निघून जाईल.या सोप्या उपायांच्या मदतीने तुम्ही ऑक्टोबर हीटच्या कडक उन्हातही तुमचे घर थंड ठेवू शकता.

## चहाऐवजी सकाळी उठल्यानंतर करा 'या' हेल्दी पेयांचे सेवन

**मुंबई,प्रतिनिधी:** सकाळी उठल्यानंतर चहा पिण्याची अनेकांना सवय असते, पण आरोग्याच्या दृष्टीने रिकाम्या पोटी चहा पिणे टाळायला हवे. त्याऐवजी तुम्ही सकाळी शरीराला डिटॉक्स आणि ताजेतवाने ठेवण्यासाठी हेल्दी ड्रिंक्स प्यायला हवे. आज आपण सकाळी चहाऐवजी कोणत्या हेल्दी पेयांचे सेवन करायला हवे याविषयी जाणून घेऊयात.सकाळी उठल्यावर एक ग्लास कोमट पाण्यात अर्ध्या लिंबाचा रस टाकून प्यायल्याने पचनक्रिया सुधारते, रोगप्रतिकारशक्ती वाढते आणि शरीरातील विषारी घटक बाहेर पडण्यास मदत होते.चहाऐवजी तुम्ही आल्याचा आणि तुळशीच्या पानांचा उकळलेला काढा पिऊ शकता. यामुळे सर्दी-खोकल्यापासून बचाव होतो आणि शरीराला ऊर्जा मिळते.रात्री एका ग्लास पाण्यात एक चमचा जिरे किंवा बडीशेप भिजत ठेवा आणि सकाळी ते पाणी गाळून प्या. हे पेय अपचनावर आणि वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी गुणकारी ठरते.सकाळच्या वेळेस ताजे नारळ पाणी पिणे आरोग्यासाठी फायदेशीर असते. यामध्ये इलेक्ट्रोलाइट्स भरपूर प्रमाणात असतात, ज्यामुळे शरीराला दिवसभर हायड्रेशन मिळतो.कोमट पाण्यात चिमूटभर हळद किंवा मध मिसळून प्यायल्यास शरीराची जळजळ कमी होते आणि त्वचा निरोगी राहण्यास मदत होते.

## लडाखचे गूढ ठिकाण, जेथे इंजिन बंद असतानाही गाडी चढते डोंगर

**मुंबई,प्रतिनिधी:** लडाख म्हटलं की अंगात रोमांच आणणाऱ्या अनेक गोष्टी डोळ्यांसमोर येतात. येथील विस्तीर्ण पर्वत, नागमोडी रस्ते आणि विलोभनीय सौंदर्य पर्यटकांना नेहमीच खुणावत असते. या प्रवासात लेह-कारगील महामार्गावर एक अशी जागा आहे, जिथे विज्ञानाचे नियमही थक्क होतात. या ठिकाणाला मॅग्नेटिक हिल म्हणून ओळखले जाते.या ठिकाणी पोहोचल्यावर जर तुम्ही तुमच्या गाडीचे इंजिन बंद करून ती न्यूट्रल गियरमध्ये उभी केली, तर ती गाडी मागे जाण्याऐवजी किंवा जागीच थांबण्याऐवजी हळूहळू स्वतःहून पुढच्या बाजूला डोंगर चढू लागते. कोणत्याही इंधन किंवा चालकाशिवाय गाडीला वर जाताना पाहून कोणीही अचंबित होतो. येथील या अद्भूत अनुभवामुळे देश-विदेशातील पर्यटक याठिकाणी आवर्जून भेट देतात.सुरुवातीला लोकांना असे वाटे की, या डोंगरामध्ये किंवा जमिनीखाली कोणतीतरी अफाट चुंबकीय शक्ती आहे, जी वाहनांना आपल्याकडे खेचून घेते.विज्ञानाने आणि भूगर्भशास्त्रज्ञांनी हा दावा फेटाळून लावला आहे. प्रत्यक्षात तिथे कोणतेही चुकीचे चुंबकीय आकर्षण नाही. हा केवळ एका प्रकारचा ऑप्टिकल इल्युजन (दृष्टीभ्रम) आहे. या ठिकाणची भौगोलिक रचना आणि आजूबाजूच्या पर्वतांच्या ढिगाऱ्यांची रचना अशी आहे की, प्रत्यक्षात रस्ता हा किंचित खाली उतरणीचा असतो. परंतु, तो पाहणाऱ्याला वर चढणीचा असल्याचा भास होतो. यामुळे मानवी डोळे आणि मेंदूची दिशाभूल होते आणि आपल्याला वाटते की गाडी गुरुत्वाकर्षणाच्या विरोधात जाऊन वरच्या दिशेने सरकत आहे. जरी हे एका प्रकारचा केवळ दृष्टीभ्रम असला, तरी लडाखच्या या प्रवासात हा थरारक अनुभव घेणे पर्यटकांसाठी एक वेगळाच आणि अविस्मरणीय आनंद देऊन जातो.

## कापलेली फळे काळी पडू नयेत म्हणून करा हे घरगुती उपाय

**मुंबई,प्रतिनिधी:** शाळेचा टिफीन असो वा ऑफिसचा डबा मध्ये भूक लागल्यावर खाण्यासाठी फळे हा आरोग्यासाठी नेहमीच उत्तम आणि पौष्टिक पर्याय असतो. मात्र, सफरचंद, केळी किंवा नाशपाती यांसारखी फळे कापून ठेवल्यानंतर काही वेळातच काळी पडतात. हवेतील ऑक्सिजनच्या संपर्कात आल्यामुळे होणाऱ्या रासायनिक प्रक्रियेमुळे फळांचा रंग बदलतो, ज्यामुळे ती खाण्यायोग्य राहिली आहेत की नाही असा प्रश्न पडतो. जर तुम्हालाही कापलेली फळे ताजी आणि टवटवीत ठेवायची असतील तर हा लेख तुमच्यासाठीच आहे. फळे खराब झाली म्हणून ती काळी पडत नाहीत, तर जेव्हा आपण ती कापतो तेव्हा ती हवेतील ऑक्सिजनच्या संपर्कात येतात. ऑक्सिजनसोबत होणाऱ्या रासायनिक प्रक्रियामुळे त्यांचा रंग बदलतो. उष्ण हवामान आणि चुकीच्या पद्धतीने साठवणूक केल्यास ही समस्या आणखी वाढते.

# दृश्यम ३ : 'द कन्क्लूजन':रहस्याच्या गुंत्यातून थरारक प्रवास!



**मुंबई,प्रतिनिधी:** दृश्यम ३ : द कन्क्लूजन' हा असाच एक उत्कंठावर्धक आणि थरारक अनुभव देणारा चित्रपट आहे. पहिल्या दोन भागांनी निर्माण केलेली उत्सुकता, विजय साळगावकरचे बुद्धीचे खेळ आणि त्याच्याशी जोडले गेलेले असंख्य प्रश्न पुढे नेत हा तिसरा भाग प्रेक्षकांना पुन्हा एका गुंतागुंतीच्या रहस्यविश्वात घेऊन जातो. काही चित्रपट केवळ कथा सांगत नाहीत, तर प्रेक्षकांना त्या कथेचा एक भाग बनवतात. चित्रपट संपल्यानंतर आपण थिएटरबाहेर पडतो, मात्र काही अनुभव मनातून सहज बाहेर पडत नाहीत. मल्याळममधील 'दृश्यम ३' काही क्षणी मल्याळम आवृत्ती विसरावीशी वाटते. कारण हा सिनेमा पुरता वेगळा आहे. चित्रपटातील प्रत्येक प्रसंगात तणाव आणि उत्कंठा इतकी प्रभावीपणे निर्माण केली आहे की पुढच्या क्षणी नेमके काय घडणार, कोणता धागा कोणत्या रहस्याशी जोडला जाणार आणि विजय साळगावकर पुन्हा एकदा या संकटातून कसा मार्ग काढणार, याची उत्सुकता शेवटपर्यंत कायम राहते. कथेचे मूळ सूत्र पहिल्या दोन भागांशी घट्ट जोडलेले आहे. विजय साळगावकर आणि त्याच्या कुटुंबाभोवती घडलेल्या घटनांचे पडसाद अजूनही कायम आहेत. भूतकाळ पुन्हा वर्तमानासमोर उभा राहतो आणि जुन्या घटनांशी संबंधित अनेक प्रश्न नव्या परिस्थितीत पुन्हा समोर येतात. यावेळी विजयसमोरील आव्हान अधिक गुंतागुंतीचे आहे. तपासाची बदलती दिशा, नव्याने समोर येणारे पुरावे आणि अनपेक्षित वळणे यामुळे विजयला पुन्हा एकदा आपल्या बुद्धिमत्ता, संयम आणि प्रसंगावधानाची कसोटी द्यावी लागते.या चित्रपटातील महत्त्वाचे ट्विस्ट किंवा रहस्य आधीच उलगडणे योग्य ठरणार नाही. कारण दृश्यम'ची खरी ताकद केवळ कथेत काय घडते यात नसून, ते प्रेक्षकांसमोर कशा पद्धतीने उलगडते यात आहे. त्यामुळे प्रत्येक संवाद, प्रत्येक दृश्य आणि पडद्यावर दिसणारी अगदी छोटीशी गोष्टही लक्षपूर्वक पाहावी लागते. सुरुवातीला साधा वाटणारा एखादा प्रसंग पुढे जाऊन कथेसाठी किती महत्त्वाचा ठरू शकतो, याची जाणीव सतत होत राहते.विजय साळगावकरच्या भूमिकेत अजय देवगण पुन्हा एकदा संयत आणि प्रभावी दिसतो. शांतपणा, परिस्थितीचे बारकाईने निरीक्षण आणि योग्य क्षणी योग्य निर्णय घेण्याची क्षमता हे या व्यक्तिरेखेचे वैशिष्ट्य आहे. अजय देवगणने हे केवळ संवादांमधून नव्हे, तर डोळ्यांतील भाव, चेहऱ्यावरील सूक्ष्म हालचाली आणि देहबोलीतून प्रभावीपणे व्यक्त केले आहे. अनेक प्रसंगांत संवादांपेक्षा त्यांचे मौन अधिक काही सांगून जाते. यावेळी विशेष उल्लेख करावा लागतो तो जयदीप अहलावत यांच्या अभिनयाचा. चेहऱ्यावर बदलणारे भाव, प्रसंगानुरूप एक्स्प्रेशन्स आणि व्यक्तिरेखेतील बारकावे त्यांनी अत्यंत ताकदीने साकारले आहेत. अनेक दृश्यांत त्यांचे संवाद जितके प्रभावी आहेत, तितकेच त्यांचे हावभावही बोलके ठरतात. पडद्यावर त्यांची उपस्थिती जाणवते आणि त्यांनी आपल्या व्यक्तिरेखेला वेगळी धार दिली आहे. तब्बू यांनी व्यक्तिरेखेतील भावनिक गुंतागुंत, ताण आणि अस्वस्थता संयमाने साकारली आहे. प्रकाश राज यांच्या संवादफेकीत आणि देहबोलीत अनुभवाची ताकद जाणवते. कमलेश सावंत, श्रेया सरन आणि इतर कलाकारांनीही आपापल्या भूमिका प्रभावीपणे साकारत कथेला भावनिक आधार दिला आहे. चित्रपटाचे संवाद हेही त्याचे महत्त्वाचे बलस्थान आहे. आमिल कियान खान यांनी लिहिलेले संवाद वरवर साधे वाटले तरी त्यामध्ये कथेशी संबंधित अनेक संदर्भ दडलेले जाणवतात. काही संवादांचा खरा अर्थ कथा पुढे सरकल्यानंतर अधिक स्पष्ट होतो आणि त्यामुळे प्रेक्षकांची उत्सुकता कायम राहते. तांत्रिक बाजूनेही चित्रपट भक्कम आहे. सुधीर कुमार चौधरी यांच्या सिनेमॅटोग्राफीमधून गोव्याचे निसर्गसौंदर्य आणि कथेतील रहस्यमय वातावरण यांचा सुंदर मेळ साधला आहे. प्रकाश-छाया, कॅमेरा अँगल्स आणि दृश्यरचनेचा प्रभावी वापर चित्रपटातील तणाव अधिक गडद करतो. रवि बसरूर, रोचक कोहली आणि कर्मा यांचे संगीत तसेच अमर मोहिले यांचे पार्श्वसंगीत थरार वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. योग्य क्षणी वाढणारा बॅकग्राउंड स्कोअर अनेक प्रसंग अधिक परिणामकारक बनवतो.संदीप फ्रान्सिस यांच्या एडिटिंगमुळे चित्रपटाची गती योग्य राखली आहे. सस्पेन्सपटात एखादा प्रसंग किती वेळ टिकवायचा आणि कुठे वेग वाढवायचा, याचा समतोल साधला आहे. बायलॉन फोन्सेका यांचे साउंड डिझाइनही वातावरणनिर्मितीत महत्त्वाचे ठरते. या चित्रपटात आवाजाइतकीच शांतताही प्रभावीपणे वापरली गेली आहे. अभिषेक पाठक यांनी दिग्दर्शक म्हणून कथा, पटकथा, अभिनय, संवाद, संगीत, सिनेमॅटोग्राफी आणि एडिटिंग या सर्व घटकांना एकत्र बांधत चित्रपटाचा थरार शेवटपर्यंत कायम ठेवला आहे. मूळ कथा जीतू जोसेफ यांची असल्याने दृश्यम'च्या मूळ विश्वाशी असलेले नातेही टिकून राहते.एकूणच, दृश्यम ३ : 'द कन्क्लूजन' हा केवळ सस्पेन्स-थ्रिलर नाही, तर प्रेक्षकांना शेवटपर्यंत खुर्चीत खिळवून ठेवणारा सिनेमॅटिक अनुभव आहे. अजय देवगणचा संयत अभिनय, जयदीप अहलावतचा दमदार परफॉर्मन्स, तब्बू आणि प्रकाश राज यांची प्रभावी साथ, परिणामकारक संवाद, सुंदर सिनेमॅटोग्राफी, थरार वाढवणारे संगीत आणि पार्श्वसंगीत, चपखल एडिटिंग आणि प्रभावी साउंड डिझाइन यांचे उत्तम मिश्रण चित्रपटाला वेगळी उंची देते. रहस्याच्या या गुंत्यात शिरून प्रत्येक दृश्याचा अर्थ शोधत विजय साळगावकरच्या बुद्धीच्या खेळाचा शेवटपर्यंत भागीदार होणे, हाच या चित्रपटाचा खरा आनंद आहे. सीटवरून हलू न देणारा, प्रत्येक क्षणी पुढे काय होईल याची उत्सुकता वाढवणारा आणि पडदा पडल्यानंतरही मनात रेंगाळणारा हा थरारक अनुभव नक्कीच पाहण्यासारखा आहे.



## 'या' गावाला महाराष्ट्रातील 'भुताचं गाव' म्हणून ओळख

**मुंबई,प्रतिनिधी:**

सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यातील गोंदेमाळ हे गाव एका अनोख्या पारंपरिक प्रथेमुळे चर्चेत आहे. गावात पूर्वीपासून अशी धारणा होती की ठरावीक काळात गावात भूत-पिशाच्चांचा वावर असतो. त्यामुळे दर तीन वर्षांनी ग्रामस्थ काही दिवसांसाठी गाव पूर्णपणे सोडून बाहेर मुक्काम करतात.ही परंपरा 'पळ' म्हणून ओळखली जाते. गुढीपाडव्याच्या तिसऱ्या दिवशी ग्रामस्थ गुराढोरांसह गावाबाहेर जातात आणि शेजारच्या गावात मुक्काम करतात. या काळात घरांमध्ये चूल पेटवली जात नाही. दिवसा काही लोक कामासाठी गावात येतात, मात्र सूर्यास्तापूर्वी पुन्हा गावाच्या वेशीबाहेर जातात. काही दिवसांनंतर काळभैरवनाथाचा कौल घेतला जातो आणि त्यानंतर ग्रामस्थ पुन्हा गावात प्रवेश करतात.मात्र, गावात प्रत्यक्ष भुतं असल्याचा कोणताही वैज्ञानिक पुरावा उपलब्ध नाही. गावकऱ्यांच्या मते ही प्रथा पूर्वजांपासून चालत आलेली परंपरा आहे. यामागे पूर्वी गावात वंशवाढ होत नसल्याची एक आख्यायिकाही सांगितली जाते. त्यामुळे 'भुताचं गाव' ही ओळख मुख्यतः स्थानिक श्रद्धा आणि जुन्या परंपरेशी संबंधित आहे, वैज्ञानिक तथ्य म्हणून नव्हे.

## घरात 'या' ७ ठिकाणी चुकनही तुळस लावू नका, अनेक समस्यांना घेरलं जाईल घर



तुळशीच्या रोपाला हिंदू धर्मात मोठं धार्मिक महत्त्व आहे. प्रत्येकाच्या घरात तुळशीचं रोप असतंच. पण कोणत्या जागी तुळशीचं रोप असायला हवं आणि कोणत्या जागी नाही? याबद्दल फार कोणाला माहिती नसतं.हिंदू धर्मात तुळस फक्त रोप नाही तर, त्याला फार मोठं धार्मिक महत्त्व आहे, अनेक पूजा विधींमध्ये तुळशीचा वापर केला जातो तुळाशीला प्रचंड पवित्र देखील मानलं जातं. सांगायचं झालं तर, धार्मिक मान्यतेनुसार, तुळस हे देवी लक्ष्मीचं एक रूप असून ती भगवान विष्णूला अत्यंत प्रिय आहे. याच कारणामुळे, अनेक घरांमध्ये दररोज तुळशीची पूजा केली जाते आणि संध्याकाळी तिच्याजवळ दिवा लावला जातो. पण घरात कोणत्या जागी तुळशीचं रोप लावायला हवं याबद्दल अनेकांना मोठा प्रश्न पडलेला असतो. वास्तूशास्त्रात सांगितल्यानुसार, दक्षिण दिशेला तुळस ठेवू नका. वास्तूनुसार, दक्षिण दिशेला तुळशीची रोपं ठेवणं टाळावं. धार्मिक मान्यतेनुसार, दक्षिण दिशा यमदेवाशी संबंधित आहे; त्यामुळे ही दिशा तुळशीसाठी योग्य मानली जात नाही. वास्तूच्या तत्त्वांनुसार, उत्तर, पूर्व आणि ईशान्य दिशा तुळशीच्या रोपांसाठी शुभ मानल्या जातात.बेडरूममध्ये तुळशीचे रोप ठेवू नका. असेल तर लगेच दुसऱ्या ठिकाणी ठेवा, तुळस ही एक पवित्र आणि पूजनीय वनस्पती मानली जाते; त्यामुळे, ती बेडरूममध्ये ठेवणं योग्य नाही. धार्मिक परंपरेनुसार, तुळशीसाठी स्वच्छ आणि शांत जागेची निवड केली पाहिजे.बाथरूम किंवा शौचालयाजवळ देखील तुळस ठेवू नका: तुळशीचे रोप बाथरूम किंवा शौचालयाजवळ ठेवू नये. धार्मिक श्रद्धेनुसार, तुळशीसारख्या पवित्र वनस्पतीसाठी ही ठिकाणे अयोग्य मानली जातात. ते नेहमी अशा ठिकाणी ठेवले पाहिजे जिथे पूर्ण स्वच्छता राखता येईल.तुळस अंधाऱ्या जागी ठेवू नका. तुळशीची रोपं अपुरा प्रकाश किंवा हवा असलेल्या ठिकाणी ठेवू नयेत. बंद खोलीत किंवा घराच्या अंधाऱ्या कोपऱ्यात ठेवल्याने रोपाच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे, रोपाला पुरेसा नैसर्गिक प्रकाश आणि हवा मिळेल अशी जागा निवडणे सर्वोत्तम मानलं जातं.वास्तूशास्त्रानुसार, स्वयंपाकघरातील तुळशीचे रोप स्टोव्हजवळ ठेवू नये. जास्त उष्णता आणि धुरामुळे रोपाला हानी पोहोचू शकते. त्यामुळे, स्वयंपाकघरात तुळस ठेवली असली तरी, ती स्टोव्हपासून पुरेशा अंतरावर ठेवावी. तुळस ही एक पवित्र वनस्पती मानली जाते. त्यामुळे, ती कचरा, अस्वच्छ जागा किंवा अस्वच्छ ठिकाणी ठेवू नये. धार्मिक परंपरांनुसार तुळशीच्या रोपाच्या सभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवण्यावर आणि तिची नियमितपणे काळजी घेण्यावर भर दिला जातो.घरातील जिन्याखाली तुळशीचे रोप ठेवणे टाळावे. अशा ठिकाणी अनेकदा पुरेसा प्रकाश आणि हवा मिळत नाही. तसेच, सततच्या वर्दळीमुळे रोपाची योग्य काळजी घेणे अवघड होते. म्हणून, तुळशीसाठी अशी जागा निवडणे उचित आहे, जिथे ते मोकळ्या जागेत ठेवता येईल आणि त्याची नियमितपणे काळजी घेता येईल.

## रानटी वनस्पती समजून दुर्लक्ष करू नका!

**मुंबई,प्रतिनिधी:** शेताच्या बांधावर, रस्ताच्या कडेला किंवा मोकळ्या जागेत उगवणाऱ्या अनेक वनस्पतींकडे आपण साधं रानटी गवत म्हणून पाहतो. पण यातील काही वनस्पतींचा वापर भारतीय पारंपारिक उपचारपद्धती आणि आयुर्वेदात अनेक वर्षांपासून केला जातो. विशेष म्हणजे यातील काही वनस्पती घराच्या बागेत किंवा कुंडीतही वाढवता येतात.अडुळसा ही रस्त्याच्या कडेला असणारी आणि सहज ओळखू येणारी वनस्पती आहे. याची पाने लांबट झुडुपासारखी असतात. आयुर्वेदामध्ये याचा वापर विशेषत: श्वसनाच्या संबंधित उपायांमध्ये केला जातो. कफ किंवा खोकला लागल्यावर सिरप पिण्याऐवजी अडुळशाच्या पानांचा रस प्यायला जातो.घराच्या अंगणात, शेताच्या बांधावर, रस्त्याच्या कडेला कडुनिंबाची झाडे हमखास दिसतात. कडुनिंबाच्या मुळापासून ते पानापर्यंत याचा सर्वच गोष्टीत वापर केला जातो. त्यामुळे कडुनिंब अतिशय गुणकारी मानले जाते. त्वचेचे इंफेक्शन, केसांची वाढ, त्वचेचा ग्लो वाढवणे, यासाठी कडुनिंबाचा वापर केला जातो. कडुनिंबाची पाने घरात ठेवल्याने नकारात्मकता दूर होते. घरात रोग,किड जीवजंतू फार काळ टिकत नाही.तुळस फक्त धार्मिक कारणांसाठी घरात ठेवली



जाते असं नाही. भारतीय पारंपरिक आरोग्यपद्धतीत तुळशीला विशेष महत्त्व आहे. गावाकडील घरांच्या अंगणात, शेताजवळ तुळशीची रोपं सहज आढळतात. तुळशीच्या पानांचा वापर सर्दी, खोकला, घशाशी संबंधित उपायांमध्ये केला जातो. त्यामुळे बाकी काही लावता येणं शक्य नसलं तरी कुंडीत तुळस लावता येते त्यामुळे ती लावू शकता.भुईआवळा ही जमिनीवर वाढणारी छोटी वनस्पती आहे. पावसाळ्यात किंवा ओलावा असणाऱ्या ठिकाणी ती दिसून येते. नावात आवळा असला तरी ही वनस्पती नेहमीच्या आवळ्याच्या झाडापेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. आयुर्वेदात भुईआवळ्याचा वापर यकृताशी संबंधित आजारांवर वापर केला जातो.पुनर्नवा ही मोकळ्या जागेत आणि शेतीच्या परिसरात आढळणारी वनस्पती आहे. जमिनीलगत पसरत जाणारी तिची वाढ आणि विशिष्ट पानं यामुळे ती ओळखता येते. आयुर्वेदात पुनर्नवाचा वापर हा शरीरातील द्रवसंतुलन, सूज आणि मूत्रविषयक आजारांवर मात करण्यासाठी केला जातो.ब्राम्हीची वाढ ही ओलसर ठिकाणी आणि पाण्याच्या आसपासच्या ठिकाणी होते . त्यामुळे शेतीच्या परिसरात,ओलसर जमिनीवर आणि पाणथळ जागांवर ही औषधी वनस्पती आढळते. स्मरणशक्ती सुधारण्यासाठी, सौंदर्यप्रसाधनाच्या गोष्टिंसाठी आणि मानसिक शांतता राखण्यासाठी ब्राम्हीचा वापर केला जातो.आघाडा ही मोकळ्या जागेत, रस्त्याच्या कडेला आणि शेताच्या बांधावर सहज दिसणारी वनस्पती आहे. ग्रामीण भागात ही वनस्पती मोठ्या प्रमाणात आढळते. दमा किंवा श्वसनाचे आजार असलेल्या लोकांनी याचे सेवन करावे असे सांगितले जाते. याच्या पानांचा रसाचा वापर अपचन, पोटफुगी, गॅस , बद्धकोष्ठता दूर करण्यासाठी केला जातो.

## पोटाची चरबी झटपट कमी करण्यासाठी काही रामबाण उपाय

**मुंबई,प्रतिनिधी:**आजची झपाट्याने बदलती लाईफस्टाईल, खाण्याच्या समवी, व्यायामाचा आाभाव या सर्व गोष्टींमुळे पोटाच्या भागात चरबी जमा होणं ही अनेक लोकांसाठी एक मोठी समस्या आहे. एवंढच नाही तर, कामाच्या ताणामुळे अनेकांची झोप देखील पूर्ण होत नाही. हे देखील वजन वाढीसाठी मुख्य कारण आहे. रात्री ७ - ८ तास नियमित झोप घेतल्याने आणि तणावावर नियंत्रण ठेवल्याने कॉर्टिसोल हार्मोनचा स्राव कमी होऊ शकतो आणि पोटावरील चरबी टाळता येते. आपल्या रोजच्या आहारात अंडी आणि डाळींसारख्या उच्च-प्रथिनयुक्त पदार्थांचा समावेश केल्याने भूक नियंत्रित राहते आणि कॅलरी जलद गतीने जळतात. तर जाणून घ्या पोटाची चरबी कमी करण्यासाठी दररोज न चुकता काय केलं पाहिजे.जेव्हा तुम्हाला रात्री पुरेशी झोप मिळत नाही, तेव्हा शरीरात स्रवणाऱ्या हार्मोन्सचं संतुलन बिघडतं.

विशेषतः, नियमित झोपेची कमतरता आणि अतिरिक्त तणावामुळे शरीरातील कॉर्टिसोल' हार्मोन वाढतो, ज्यामुळे पोटाच्या भागात चरबी जमा होण्यास चालना मिळते. त्यामुळे, पोटावरील चरबी कमी करण्यासाठी दररोज ७ ते ८ तास गाढ झोप घेणं खूप महत्त्वाचं आहे.आपल्या रोजच्या आहारात अधिक प्रथिने समाविष्ट केल्याने भूक नियंत्रित ठेवण्यास मदत होते. प्रथिनयुक्त पदार्थ पचायला जास्त वेळ लागत असल्यामुळे, वारंवार आणि अनावश्यक खाणं टाळण्यास मदत होते. आपल्या आहारात मासे, अंडी, कडधान्ये आणि सुकामेवा यांचा समावेश केल्याने कॅलरी जलद गतीने खर्च होऊ शकतात.सर्वात महत्त्वाचं म्हणजे शुद्ध साखर आणि गोड पेये पोटावरील चरबी वाढण्यास प्रमुख कारणीभूत ठरतात. यांमधील अतिरिक्त फ्रुक्टोजचं यकृतामध्ये चरबीत रूपांतर होतं आणि ती पोटाच्या भागात जमा होते.


## बृहन्मुंबई महानगरपालिका

**खाते - जल अभियंता विभाग**

**क्र. कार्य. अभि.(परि.) ज.मा.का./३३३०/दि. ०६-१०-२०२६**

### ई-निविदा सुचना

बृहन्मुंबई महानगरपालिकेव्दारे खालील नमुद विषायांकित कामांसाठी, इच्छुक निविदाकारांकडुन ऑनलाईन ई- निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा वितरण व विक्री दिनांक आणि वेळ, निविदा विक्री नियत दिनांक आणि वेळ या बाबतचा तपशीलवार बृहन्मुंबई महानगरपालिकेची वेबसाईट अर्थात http://portal.mcgm.gov.in वर आणि महाटेंडर संकेतस्थळावर अर्थात http://mahatenders.gov.in निविदा अवलोकन अंतर्गत प्रसिद्ध/ अपलोड करण्यात आली आहे.

| अ.क्र. | निविदा क्रमांक | निविदेचा विषय |
|---|---|---|
| १ | २०२६_एमसीजीएम_१३४२८३८_१ | सहायक अभियंता (परि.) जलकामे शहर विभागांतर्गत विविध परिरक्षण कामांसाठी ९९.९९% शुद्धतेच्या शिसेच्या लगडीचा पुरवठा करणेबाबत. (निविदा जारी दि. ०७.१०.२०२६) |

इच्छुक निविदाकारानी तपशीलवार माहितीकरिता महाटेंडर संकेतस्थळावर अर्थात http://mahatenders.gov.in आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेची वेबसाईट अर्थात http://portal.mcgm.gov.in वर भेट द्यावी.

**स्वाक्षरी/-**

PRO/1614/ADV/2026-27 **कार्य.अभि.(परि.) ज.मा.का.**

पाण्याचा जपून वापर करा! पाणी अमूल्य आहे!!

# ‘पार्टिसिपेट मुंबई’तून जनसहभागाला नवी दिशा मिळणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार्टिसिपेंट मुंबई उपक्रमाचे लोकार्पण



मुंबई, दि. ६ : पार्टिसिपेट मुंबई’ हा केवळ सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) निधी उभारण्याचा मंच नसून शासन, महापालिका, कॉर्पोरेट आणि सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन विकासासाठी काम करण्याचे व्यासपीठ आहे. समग्र संस्थेबरोबरच्या सामंजस्य करारामुळे महापालिकेच्या सेवा वितरण व्यवस्थेत सुधारणा, प्रशासकीय प्रक्रिया सुलभ होण्यास व कार्यक्षमता वाढण्यास मदत होणार आहे. या दोन्ही उपक्रमांमुळे मुंबईच्या विकासाला लोकसहभाग आणि गतिमान प्रशासनाची जोड मिळणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुंबईच्या विकास प्रक्रियेत नागरिक, उद्योग-व्यवसाय क्षेत्र, स्वयंसेवी संस्था आणि तज्ज्ञांचा सहभाग वाढविण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने पार्टिसिपेट मुंबई’ हा भागीदारीचा नवा डिजिटल मंच सुरू केला आहे. त्याचे लोकार्पण तसेच महापालिकेच्या सेवा वितरण व्यवस्थेत सुधारणा, प्रशासकीय प्रक्रिया सुलभ करणे आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी समग्र’ या संस्थेसोबत सामंजस्य कराराचे आदानप्रदान बृहन्मुंबई महापालिकेच्या सभागृहात करण्यात आले. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री तथा मुंबई उपनगरे जिल्हा सहपालकमंत्री मंगल प्रभात लोढा, मुंबईच्या महापौर रितू तावडे, उपमहापौर संजय घाडी, महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे, यांच्यासह महापालिकेचे पदाधिकारी, नगरसेवक, अधिकारी, कर्मचारी, उद्योग व स्वयंसेवी क्षेत्रातील प्रतिनिधी उपस्थित होते.

**‘ पार्टिसिपेट मुंबई’ हा सहभागाचा मंच**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ‘पार्टिसिपेट मुंबई’ हा केवळ कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) निधी उपलब्ध करून देणारा मंच नसून तुम्ही आणि आम्ही एकत्र येऊन समाजातील शेवटच्या घटकासाठी काय करू शकतो’ यासाठीचा सहभागाचा मंच आहे. महापालिकेला ज्या क्षेत्रात भागीदारीची आवश्यकता आहे, अशा विविध प्रकल्पांची माहिती या मंचावर उपलब्ध करून दिली जाणार आहे. शिक्षण, आरोग्य, पाणी, रोजगार, पर्यावरण, उद्याने, सौंदर्यीकरण, गरिबी निर्मूलन यांसारख्या क्षेत्रांमध्ये काम करू इच्छिणाऱ्या कंपन्या, स्वयंसेवी संस्था किंवा नागरिकांना त्यांच्या आवडीच्या प्रकल्पाची निवड करता येणार आहे.

एखाद्या संस्थेला विशिष्ट क्षेत्रात काम करायचे असल्यास त्यांची स्वतःची योजना देखील या मंचावर मांडता येणार आहे. त्यामुळे महापालिका आणि सामाजिक तसेच कॉर्पोरेट क्षेत्र यांच्यातील दरी कमी होऊन विकासकामांना अधिक गती मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्वासाठी (सीएसआर) किती निधी खर्च झाला, यापेक्षा त्यातून किती लोककल्याण झाले आणि कोणता परिणाम साधला, हे अधिक महत्त्वाचे असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

सीएसआरच्या माध्यमातून काम करणाऱ्या संस्थांकडून शासनाला नवीन तंत्रज्ञान, आधुनिक व्यवस्थापन पद्धती, प्रभावी निरीक्षण व्यवस्था आणि लवचिक कार्यपद्धती मिळते. शासनाच्या पारंपरिक प्रशासकीय प्रक्रियांमध्ये काही मर्यादा असतात. त्यामुळे सरकारी यंत्रणा आणि सीएसआर भागीदार यांची सांगड घातल्यास अधिक परिणामकारक काम होऊ शकते, असेही त्यांनी सांगितले.

**मुंबईतील कुपोषणावर लक्ष केंद्रित करण्याची गरज**

मुंबई महापालिकेने पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात मोठे काम केले आहे. त्याचबरोबर शिक्षण, आरोग्य आणि पोषण या क्षेत्रांतही अधिक परिणामकारक हस्तक्षेप करण्याची गरज आहे. शहरातील काही भागांत कुपोषण, बालकांमधील खुंटलेली वाढ आणि कृशता या सारख्या समस्या अद्याप दिसून येतात. विशेषतः झोपडपट्ट्या आणि गरीब वस्त्यांमधील मुलांपर्यंत पोषण पोहोचविण्यासाठी सीएसआर भागीदारीचा प्रभावी वापर करण्याची गरज आहे. पोषणाचा थेट संबंध मुलांच्या मेंदूच्या विकासाशी, शिक्षणातील कामगिरीशी आणि रोगप्रतिकारक क्षमतेशी आहे. त्यामुळे पोषणाच्या क्षेत्रात प्रभावी हस्तक्षेप केल्यास पुढील पिढीच्या विकासावर त्याचा दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

**‘समग्र’सोबत प्रशासकीय प्रक्रियांचे पुनर्रचना**

बृहन्मुंबई महापालिका प्रशासन अधिक गतिमान, पारदर्शक आणि नागरिककेंद्रित करण्यासाठी समग्र’ संस्थेसोबत करण्यात आलेला सामंजस्य करार हा महत्त्वाचा टप्पा आहे. प्रशासन हीच विकास आणि परिवर्तनाची प्रमुख यंत्रणा असल्याने सरकारी प्रक्रिया काळानुसार बदलणे आवश्यक आहे. आजही अनेक सरकारी प्रक्रिया जुन्या पद्धतीने सुरू आहेत. अनेक वर्षांपूर्वी तयार झालेल्या प्रक्रिया आजच्या काळात तशाच पद्धतीने राबविणे योग्य नाही. आज नागरिकांना तत्काळ सेवा आणि समस्यांचे निराकरण अपेक्षित आहे. त्यामुळे प्रशासनातील अनावश्यक टप्पे कमी करून बिझनेस प्रोसेस रिइंजिनिअरिंग’ करण्याची गरज आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

राज्य शासनाने नागरिकांसाठी सुमारे ११०० सेवा ऑनलाइन करण्याचा प्रयत्न केला. मात्र, या सेवांचे विश्लेषण केल्यानंतर त्यातील सुमारे २०० सेवांचा नागरिकांकडून प्रत्यक्ष वापरच होत नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे नागरिक मोठ्या प्रमाणावर वापरत असलेल्या सुमारे ४५ ते ४७ सेवा आणि योजनांच्या वितरण प्रक्रियेत सुधारणा केल्यास ९० टक्के नागरिकांना अधिक वेगवान आणि चांगली सेवा देता येईल, असे निर्दशनास आले. या प्रक्रियेचे पुनर्रचनाकरण अंतिम टप्प्यात असून लवकरच त्याची अंमलबजावणी केली जाणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

**‘एआय’च्या माध्यमातून बांधकाम परवानगी प्रक्रियेत बदल**

बृहन्मुंबई महापालिकेच्या बांधकाम विभागात बांधकाम आराखड्यांच्या छाननीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर (एआय) आधारित प्रणाली सुरू करण्यात आली आहे. भविष्यात मानवी हस्तक्षेप कमीत कमी करून किंवा शून्य मानवी हस्तक्षेपाच्या दिशेने ही प्रक्रिया नेण्याचे उद्दिष्ट ठेवावे, त्यामुळे मुंबईतील व्यवसाय सुलभतेला चालना मिळेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. काळानुसार प्रशासनाने स्वतःमध्ये बदल घडवून आणला पाहिजे. आम्ही इतकी वर्षे ही प्रक्रिया करत आलो, आम्हाला कोणी काय शिकवणार’ अशी मानसिकता बदलण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**नागरिकांच्या सहभागाला संस्थात्मक स्वरूप : महापौर रितू तावडे**

‘पार्टिसिपेट मुंबई’ आणि समग्र’सोबतचा करार हा मुंबईच्या प्रशासकीय इतिहासातील महत्त्वाचा टप्पा असल्याचे महापौर रितू तावडे यांनी सांगितले. मुंबईच्या विकासात जनसहभागाला संस्थात्मक स्वरूप देण्याच्या दिशेने हा प्रयत्न आहे. यापुढे प्रशासन आणि जनता अशी दोन टोकांची व्यवस्था न राहता मुंबईकरांची सामूहिक शक्ती’ ही शहराच्या विकासाची नवी ओळख ठरेल, असे त्यांनी सांगितले.

सीएसआर हा केवळ निधी देण्याचा विषय नसून चेक नव्हे, चेंज’ घडविण्याचे माध्यम असले पाहिजे. मुंबईकरांना त्यांच्या शहरासाठी काहीतरी करण्याची इच्छा असते. उद्योग, संस्था, स्वयंसेवी संघटना आणि नागरिकांच्या या क्षमतेला महापालिकेच्या गरजांशी जोडण्याचे काम पार्टिसिपेट मुंबई’ करेल, असे श्रीमती तावडे यांनी सांगितले.

सामान्य मुंबईकराला महापालिका कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत, तक्रारींचे वेळेत निवारण व्हावे आणि पारदर्शक व सुरक्षित सेवा मिळाव्यात, यासाठी प्रशासकीय यंत्रणा संवेदनशील व गतिमान असणे आवश्यक आहे. लोकसहभाग आणि सक्षम प्रशासनाच्या एकत्रित प्रयत्नांतून मुंबईची सेवा व्यवस्था अधिक परिणामकारक होईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

**प्रशासनाची क्षमता व सेवा वितरण अधिक मजबूत होणार : आयुक्त अश्विनी भिडे**

मुंबईसारख्या दोन कोटींहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहराला नागरिककेंद्रित, पारदर्शक आणि जलद सेवा देण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेत सातत्याने सुधारणा करणे आवश्यक असल्याचे महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी प्रास्ताविकात सांगितले.

पार्टिसिपेट मुंबई’च्या माध्यमातून उद्योग, कॉर्पोरेट संस्था, स्वयंसेवी संस्था, तज्ज्ञ आणि नागरिकांना महापालिकेच्या विविध प्रकल्पांमध्ये सहभागी होता येईल. निधी, वस्तुरूप मदत, तज्ज्ञांचे ज्ञान किंवा स्वयंसेवा अशा विविध स्वरूपात नागरिकांचा सहभाग घेण्यात येणार आहे. विविध विभाग आणि प्रभागांच्या कामगिरीचे मूल्यमापन व तुलनात्मक आढावा घेण्याची व्यवस्थाही विकसित करण्याचा प्रयत्न आहे. एकीकडे पार्टिसिपेट मुंबई’च्या माध्यमातून बाह्य घटकांची क्षमता, तज्ज्ञता आणि संसाधने मुंबईच्या गरजांशी जोडली जातील, तर दुसरीकडे समग्र’च्या सहकार्याने महापालिकेची अंतर्गत प्रशासकीय क्षमता आणि सेवा वितरण व्यवस्था मजबूत केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

उपमहापौर संजय घाडी यांनी आभार व्यक्त केले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते पार्टिसिपेट मुंबई व समग्र उपक्रमाच्या माहिती पत्रिकेचे अनावरण करण्यात आले. मुंबईमध्ये उभारण्यात येणाऱ्या दहा नवीन सुविधा केंद्रांसाठी हिंदुस्थान युनिलिव्हर कंपनीतर्फे सीएसआरमधून २५ कोटी रुपयांचा निधी यावेळी बृहन्मुंबई महापालिकेकडे सुपूर्द करण्यात आला.

# २५ वर्षे राष्ट्रसेवेची, विकासाची आणि अभिमानाची



**७ ऑक्टोबर २००१ रोजी नरेंद्र मोदी या निष्ठावान राष्ट्रसेवकाने गुजरातच्या मुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतली आणि तेथून सुरू झालेला सेवेचा प्रवास पुढे २६ मे २०१४ रोजी भारताच्या पंतप्रधानपदापर्यंत पोहोचला. आज, २५ वर्षांच्या या प्रवासाकडे मागे वळून पाहताना तो केवळ एका नेत्याच्या राजकीय कारकिर्दीचा आलेख वाटत नाही; तो देशाच्या बदलत्या राजकीय, सामाजिक आणि विकासाच्या प्रवासाशी जोडलेला अध्याय ठरतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हा २५ वर्षांचा हा ’सेवा, संकल्प आणि समर्पण’चा प्रवास आहे. १४० कोटी भारतीयांच्या वाढत्या आत्मविश्वासाचा हा प्रवास आहे. या निमित्ताने महाराष्ट्रातील १३ कोटी जनता आणि शिवसेनेच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मनःपूर्वक शुभेच्छा.**



**एकनाथ शिंदे,**
**उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र**

वडनगरच्या मातीतील हा आवाज आज जागतिक व्यासपीठावर भारताच्या भूमिकेचा प्रभावी स्वर आहे. गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून ७ ऑक्टोबर २००१ ते मे २०१४ या काळात मोदी यांनी राज्याच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. विनाशकारी भूज भूकंपाच्या पार्श्वभूमीवरच त्यांनी मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारली. भूज आणि कच्छ परिसरातील पुनर्वसन, पुनर्बांधणी आणि नवनिर्माणाच्या कामांना वेग देण्यात आला. २००३ मध्ये ‘व्हायब्रंट गुजरात ग्लोबल समिट’ ची सुरुवात केली. या परिषदेच्या माध्यमातून जगभरातील मोठ्या कंपन्या आणि उद्योगपतींना गुजरातमध्ये गुंतवणूक करण्यासाठी आकर्षित करण्यात आले. हे गुजरात मॉडेल देशवासियांना भावले. कारण, त्याचवेळी, देशात विकास या नावाखाली दिलेली पोकळ आश्वासने, भ्रष्टाचार आणि गरिबी हटवण्याच्या नावाखाली श्रीमंतांच्या तिजोऱ्या भरण्याच्या प्रयत्नांविरोधात असंतोष वाढत होता. त्या असंतोषाच्या ठिणग्यांचे राजकीय ऊर्जेत रूपांतर करण्याचे काम मोदीजींनी केले.

२०१४ पूर्वीचा भारत आणि २०१४ नंतरचा भारत या दोघांमध्ये मोठा फरक दिसून येतो. जेव्हा एका देशाचा पंतप्रधान बदलतो, तेव्हा केवळ सरकार बदलत नाही, देशाचे भविष्य बदलते आणि तोच करिष्मा २०१४ नंतर घडला. नरेंद्र मोदी यांनी २६ मे २०१४ रोजी भारताच्या पंतप्रधानपदाची शपथ घेतली. त्यानंतर केंद्र सरकारच्या धोरणांमध्ये विकास, पायाभूत सुविधा, डिजिटल तंत्रज्ञान, सामाजिक कल्याण आणि राष्ट्रीय सुरक्षेला विशेष महत्त्व देण्यात आले.

जनधन योजनेच्या माध्यमातून बँकिंग व्यवस्थेशी मोठ्या संख्येने नागरिकांना जोडण्याचा प्रयत्न झाला. थेट लाभ हस्तांतरण आणि सरकारी सेवांच्या डिजिटलीकरणाला वेग मिळाला. ‘स्वच्छ भारत मिशन’च्या माध्यमातून स्वच्छता आणि शौचालयनिर्मितीवर भर देण्यात आला. पंतप्रधान आवास योजना, उज्ज्वला योजना, जलजीवन मिशन आणि पीएम-किसान यांसारख्या योजनांमधून घर, स्वयंपाकाचे स्वच्छ इंधन, नळाद्वारे पाणी आणि शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत अशा विविध क्षेत्रांत सरकारने ऐतिहासिक काम केले.

डिजिटल इंडिया आणि यूपीआयच्या विस्तारामुळे डिजिटल व्यवहारांच्या क्षेत्रात मोठा बदल झाला. महामार्ग, रेल्वे, विमानतळ आणि इतर पायाभूत सुविधांच्या विस्ताराला गती देण्यात आली. ‘मेक इन इंडिया’, ‘स्टार्टअप इंडिया’ आणि ‘आत्मनिर्भर भारत’ यांसारख्या उपक्रमांमधून देशांतर्गत उत्पादन, गुंतवणूक आणि उद्योजकतेला चालना दिली जात आहे. नवीन शैक्षणिक धोरण, नवीन फौजदारी कायदे आणि तिहेरी तलाकविरोधी कायदा यांसारखे निर्णयही मोदी सरकारच्या कार्यकाळात झाले. काश्मिरचे ३७० कलम हटवण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्याचे धाडसही मोदी सरकारने दाखवले. गेल्या १२ वर्षांतील अशा असंख्य निर्णयांमुळे भारतीय राजकारण, अर्थकारण, प्रशासन आणि सामाजिक धोरणांच्या दिशेवर व्यापक आणि अत्यंत सकारात्मक परिणाम झाला.

विकासाच्या अजेंड्यासोबत सांस्कृतिक वारशालाही केंद्रस्थानी आणण्याचा प्रयत्न या काळात झाला. अयोध्येतील श्रीराम मंदिराची निर्मिती आणि रामलल्लांच्या प्राणप्रतिष्ठेचा देदीप्यमान सोहळा, काशी विश्वनाथ धामचा विकास, महाकाल लोक तसेच विविध तीर्थक्षेत्रांच्या विकासातून धार्मिक पर्यटन आणि सांस्कृतिक वारसा अधोरेखित करण्यात आला. ‘विकास के साथ विरासत’ ही संकल्पना मांडत आधुनिक पायाभूत सुविधांसोबत भारताच्या सांस्कृतिक वारशाचे संवर्धन करण्यावर भर देण्यात आला.

महिला सक्षमीकरण हा केंद्र सरकारच्या विकासाचा आणखी एक महत्त्वाचा भाग. ‘बेटी बचाओ, बेटी पढाओ’पासून ‘लखपती दीदी’ पर्यंत, उज्ज्वला, मुद्रा आणि स्वयं-सहायता बचतगटांपर्यंत महिलांचा आर्थिक आणि सामाजिक सहभाग वाढवण्याच्या विविध योजना राबवण्यात आल्या.

महाराष्ट्रातही याच दिशेने महायुती सरकारने महिला सक्षमीकरणासाठी विविध निर्णय घेतले आहेत. ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना’ असो किंवा मुलींना उच्च शिक्षण देण्याचा निर्णय... महिला सक्षम झाली तर कुटुंब सक्षम होते, कुटुंब सक्षम झाले तर समाज सक्षम होतो आणि राष्ट्राची शक्ती वाढते.

राष्ट्रीय सुरक्षा आणि परराष्ट्र धोरणाच्या क्षेत्रातही मोदी सरकारच्या काळात अनेक महत्त्वपूर्ण घडामोडी झाल्या. सीमापार दहशतवादाच्या प्रश्नावर भारताने अधिक कठोर भूमिका घेतली. ब्रिक्स, ग्लोबल साऊथ, हवामान बदल, डिजिटल तंत्रज्ञान, योग आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य यांसारख्या विषयांवर भारताने आपली एक वेगळी भूमिका मांडली आहे. आज भारताचा आवाज जगातील मोठ्या मंचांवर ठामपणे ऐकला जातो. भारताच्या वाढत्या आर्थिक, सामरिक आणि राजनैतिक क्षमतेला आज महत्त्व प्राप्त झाले आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची नवी आणि सक्षम ओळख निर्माण करण्याचे श्रेय मोदीजींना आहे. त्यामुळेच जवळपास ३६ राष्ट्रांनी आपल्या सर्वोच्च नागरी पुरस्कारांनी मोदीजींना गौरविले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारचा गेल्या १२ वर्षांचा कालखंड महाराष्ट्राच्या पायाभूत आणि आर्थिक विकासासाठीही महत्त्वाचा ठरला आहे. केंद्राकडून महाराष्ट्राला मिळालेले साहाय्य केवळ निधीपुरते मर्यादित न राहता अनेक दीर्घकालीन प्रकल्पांना गती देणारे ठरले आहे.

२०१४ पूर्वीच्या दहा वर्षांत म्हणजेच २००४ ते २०१४ या काळात महाराष्ट्राच्या विकासकामांसाठी दोन लाख कोटी केंद्र सरकारने दिले होते. २०१४ ते २०२४ या काळात महाराष्ट्राला १२ लाख कोटींचा निधी मिळाला. रेल्वे क्षेत्रातील तरतुदीतही मोठी वाढ झाली आहे. २००९ ते २०१४ या काळातील सरासरी वार्षिक तरतूद १,१७१ कोटी रुपये होती, तर २०२६-२७ मध्ये ती २३,९२६ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. आजच्या घडीला राज्यात सुमारे दीड लाख कोटी रुपयांचे पायाभूत सुविधा प्रकल्प सुरू असून अमृत भारत स्थानक योजने’अंतर्गत १२८ रेल्वे स्थानकांच्या पुनर्विकासाचे काम सुरू आहे. अटल सेतू, समृद्धी महामार्ग, मुंबई कोस्टल रोड, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन आणि कोकण-पालघरच्या औद्योगिक विकासासाठी महत्त्वाचे ठरणारे ७६ हजार कोटी रुपयांचे वाढवण बंदर अशा प्रकल्प महाराष्ट्रासाठी सर्वार्थाने ‘गेमचेंजर’ प्रकल्प आहेत.

कल्याणकारी योजनांच्या माध्यमातूनही महाराष्ट्रातील नागरिकांना केंद्र सरकारच्या योजनांचा लाभ मिळत आहे. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत मे २०२६ पर्यंत १८ लाख गरीब कुटुंबांची घरे पूर्ण झाली. जल जीवन मिशनच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नळाद्वारे पाणीपुरवठ्याचे प्रमाण ३३ टक्क्यांवरून ८९ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. पीएम-किसान योजनेतून राज्यातील पात्र शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत दिली जात आहे.

महाराष्ट्राच्या विकासाबरोबरच राज्याच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक अस्मितेलाही केंद्र सरकारच्या निर्णयांमधून महत्त्व मिळाले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ऐतिहासिक किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पंचतीर्थांचा विकास आणि मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय हे महाराष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाचे टप्पे ठरले आहेत.



हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी गुजरात आणि नरेंद्र मोदी यांच्या संदर्भात हिंदुत्वाच्या राजकारणाबाबत आपली भूमिका अनेकदा स्पष्टपणे मांडली होती. महाराष्ट्र आणि गुजरातच्या राजकीय प्रवासात हिंदुत्वाच्या विचाराचा हा संवाद जुना आहे. त्यामुळे महाराष्ट्र आणि नरेंद्र मोदीजी यांच्यातील राजकीय-सामाजिक संबंधांचा हा धागाही महत्त्वाचा ठरतो.

आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा व्यक्तिगत स्नेह मला आणि माझ्या संपूर्ण कुटुंबाला लाभला, हे माझे परमभाग्य आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या निधनाने आयुष्यात निर्माण झालेली पोकळी मोदीजींच्या आपुलकीने मला मोठे बळ दिले. प्रत्येक भेटीत ते कैसे हैं एकनाथजी? असे विचारतात आणि खांद्यावर हात ठेवतात. त्या क्षणी एक नवा विश्वास निर्माण होतो, नवी उमेद मिळते आणि महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी आणखी जोमाने काम करण्याचे बळ मिळते. हा स्नेहाचा ऋणानुबंध माझ्यासाठी कायमच विशेष राहील.



गेली २५ वर्षे सतत, अथक आणि अविश्रांत काम करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवभारताच्या निर्मितीचा ध्यास घेतला आहे. विरोधकांची अत्यंत जहरी अशी द्वेषमूलक टीका, चारित्र्यहननाचे प्रयत्न, ध्रुवीकरणाचे निराधार आरोप, निंदानालस्तीचे शाब्दिक बाण असा चहूबाजूंनी मारा सुरू असतानाही मोदीजींनी कधी लक्ष्यावरून आपली नजर ढळू दिली नाही. गेल्या २५ वर्षांत नरेंद्र मोदी यांच्या जबाबदाऱ्या बदलल्या, पदे बदलली; मात्र राष्ट्रसेवेचा संकल्प आणि निर्धार तसूभरही कमी झालेला नाही. २५ वर्षांचा हा प्रवास एका व्यक्तीच्या राजकीय कारकिर्दीचा केवळ कालावधी नाही. तो बदलत्या भारताच्या राजकीय आणि विकासाच्या प्रवासातील एक महत्त्वाचा अध्याय आहे. गुजरातपासून दिल्लीपर्यंत आणि तेथून विकसित भारत २०४७च्या संकल्पापर्यंत पोहोचलेला हा प्रवास आता पुढील टप्प्याकडे पाहत आहे.

आता पुढील मोठे लक्ष्य आहे- ‘विकसित भारत २०४७’. आर्थिकदृष्ट्या सक्षम, तांत्रिकदृष्ट्या प्रगत, आत्मनिर्भर आणि सुरक्षित भारत उभारण्याचे हे ध्येय आहे. गरीबांना संधी देणारा, तरुणांच्या स्वप्नांना पंख देणारा, महिलांना समान संधी आणि नेतृत्व देणारा आणि आपल्या संस्कृतीचा अभिमान बाळगणारा भारत घडवण्याचे उद्दिष्ट या संकल्पनेत मांडले गेले आहे.

अलीकडेच प्रसंगावधान राखून १७४ विमानप्रवाशांचे प्राण वाचवणारे कॅप्टन स्मित मच्छार यांनी पंतप्रधानांशी संवाद साधताना त्यांच्याकडून प्रेरणा घेतल्याचे सांगितले. अशा प्रसंगांतून नेतृत्वाचा मोदीजींचा व्यक्तिगत प्रभाव आणि जनमानसातील त्याची प्रतिमा अधोरेखित होताना दिसते. लोकप्रियतेचे आणि कार्यकाळाचे आकडे अनेक नेत्यांच्या नावावर नोंदवले जातात. मात्र नरेंद्र मोदी यांच्या बाबतीत मोजली जाते ती केवळ दिवसांची संख्या नाही, तर त्यांच्या कार्यकाळात घेतलेल्या निर्णयांची व्याप्ती आणि त्यांनी उभा केलेला राजकीय प्रभाव. मोदीजींच्या आगामी वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा. ईश्वर त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि राष्ट्रसेवेसाठी अफाट शक्ती देवो, हीच प्रार्थना.

THIS NEWSPAPER IS PUBLISHED BY **ARCHANA SANDEEP KALE** FROM 38, 1 ST FLOOR, AGIARY CHAWL, 14/21 A, CALICUT STREET, MUMBAI, MAHARASHTRA-400001 ON BEHALF OF **ARCHANA SANDEEP KALE,** EDITED BY **ARCHANA SANDEEP KALE** AND PRINTED BY **ARCHANA SANDEEP KALE** AT MANASI PRINTERS, PLOT NO.45 A, SERVICE INDUSTRY SECTOR, CHHATRAPATI SAMBHAJI NAGAR, MAHARASHTRA-431003. **CONTACT: 8459270916,** Email-sahyadritimesmum@gmail.com, **RNI. No.MAHMAR /2007/20939**